७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. २८ जुलै २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : २१३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# पुणे शहर व परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तीन प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार : मुख्यमंत्री

## उन्नत सामुहिक वाहतूक मार्ग (एचसीएमटीआर), पुणे अंतर्गत रिंगरोड आणि बोगद्यांचे जाळे प्रकल्पांचे सादरीकरण

- प्रकल्पांना शासकीय जमिनी देण्यासाठी एकत्रित शासन निर्णय काढण्याचे निर्देश
- रिंगरोड प्रकल्पाच्या खासगी भूसंपादनासाठी रोख मोबदला



**मुंबई (दै. संध्या)**

पुणे शहर व परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी उच्चक्षमता उन्नत सामुहिक वाहतूक मार्ग (एचसीएमटीआर), पुणे अंतर्गत रिंगरोड आणि बोगद्यांचे जाळे हे तीन प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. या प्रकल्पांसाठी शासकीय जमिनींचा आगाऊ ताबा, भूसंपादन आणि प्रकल्पनिहाय प्रशासकीय प्रक्रिया समन्वयाने पूर्ण करून संबंधित पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यातील प्रमुख शहरी वाहतूक प्रकल्पांच्या नियोजन, वित्तीय व्यवस्थापन, अंमलबजावणी, देखरेखीसाठी गठित उच्चस्तरीय समितीची बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव के. एच. गोविंदराज, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी, पुणे महानगर विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त अभिजित चौधरी, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, अति पोलीस आयुक्त मनोज पाटील आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी व अति पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी सादरीकरणाद्वारे प्रकल्पांची माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उच्चक्षमता उन्नत सामूहिक वाहतूक मार्ग (एचसीएमटीआर) हा पुण्याच्या भविष्यातील दीर्घकालीन गुंतवणुकीसाठीचा एक परिवर्तनकारी पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. एचसीएमटीआर व बोगदा प्रकल्प हे पुणे शहराला अधिक कार्यक्षम, वाहतूक सुलभ व आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यात महत्वाची भूमिका बजावणार आहेत. या तीनही प्रकल्पांसाठी लागणारी शासकीय जमीन पुणे महापालिका व पुणे महानगर विकास प्राधिकरण यांना देण्यासाठी एकत्रित शासन निर्णय काढण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावे. तसेच रिंगरोड प्रकल्पासाठी लागणारी खासगी जमीन संपादनासाठी रोख मोबदला देण्यात यावा. पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उच्चक्षमता सामूहिक वाहतूक मार्ग प्रकल्प उपयुक्त ठरणार आहे. ४३.६० किमी अंतराच्या या प्रकल्पामुळे २५ ते ३० टक्के वाहतूक कमी होणार आहे.

## फुटीर खासदाराकडून उद्धव ठाकरेंना वाढदिवसाच्या शुभेच्छा, नंतर पोस्ट डिलिट

**परभणी (दै. संध्या)**



- राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा आज वाढदिवस, देशभरातून उद्धव ठाकरेंना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या जात आहेत. विविध राजकीय पक्षाचे नेते, खासदार, आमदारही त्यांना सोशल मीडियातून, फोन करुन आणि प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा देत आहेत. विशेष म्हणजे, मनसेप्रमुख राज ठाकरेंनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरेंना शुभेच्छा दिल्या. मात्र, यंदाचा उद्धव ठाकरेंना वाढदिवसा वेगळ्याच कारणाने चर्चेत आला आहे. कारण, गेल्याच महिन्यात ठाकरेंच्या 6 खासदारांनी त्यांनी साथ सोडून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यापैकी, दोन खासदारांनी आज वाढदिवसानिमित्त उद्धव ठाकरेंना सोशल मीडियातून शुभेच्छा दिल्या. मात्र, परभणीचे खासदार संजय बंडू जाधव यांनी वाढदिवसाची पोस्ट डिलिट केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. नुकतेच शिंदेंच्या शिवसेनेत दाखल झालेले परभणीचे खासदार संजय जाधव यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना वाढदिवसानिमित्त सोशल मीडियावर सकाळी दिलेल्या शुभेच्छांची पोस्ट दुपारनंतर डिलीट केल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. काही दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला सोडचिठ्ठी देत संजय जाधव यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. मात्र, आज सकाळी त्यांनी फेसबुकवर उद्धव ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देणारी पोस्ट केली होती. ही पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर, तसेच या पोस्टवर अनेकांच्या टीकात्मक कमेंट आल्यानंतर ती पोस्ट अचानक डिलीट करण्यात आली.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

## पेपरफुटी आंदोलनाच्या यशानांतर आता ई-२० पेट्रोलचा मुद्दा

### अरविंद केजरीवाल आंदोलन छेडण्याच्या तयारीत

**नवी दिल्ली (दै. संध्या)**




'नीट' पेपरफुटी प्रकरणात जंतर-मंतरवर झालेल्या आंदोलनानंतर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी दिलेल्या राजीनाम्याला आम आदमी पक्षाने तरुणांचा आणि देशातील जनतेचा मोठा विजय मानला आहे. या यशाने प्रेरित होऊन आता आम आदमी पक्षाने वाहनधारकांच्या जिव्हाळ्याच्या E-20 पेट्रोल या मुद्द्यावरून केंद्र सरकारविरोधात मोठे आंदोलन उभारण्याची तयारी सुरू केली आहे.

आप पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन या विषयावर येत्या शनिवारी विशेष 'टाउन हॉल' बैठक बोलावल्याची घोषणा केली. पत्रकार परिषदेत बोलताना अरविंद केजरीवाल म्हणाले की, E-20 पेट्रोलच्या वापरामुळे देशभरातील नागरिकांच्या गाड्या खराब होत असून इंजिनमध्ये गंभीर तांत्रिक बिघाड होत आहेत.

तसेच वाहनांचे मायलेजही कमालीचे घटले आहे. हे आंदोलन अधिक तीव्र आणि मोठे होण्याआधीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या समस्येवर तात्काळ योग्य आणि ठोस तोडगा काढावा, अशी जोरदार मागणी केजरीवाल यांनी केली आहे.

ई-20 पेट्रोलच्या विरोधात पक्षाची पुढील रणनीती ठरवण्यासाठी येत्या शनिवारी दुपारी 12 वाजता दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये एका मोठ्या 'टाउन हॉल' बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीत इंधन आणि ऑटोमोबाईल क्षेत्रातील तज्ज्ञांना आमंत्रित केले जाणार असून, E-20 पेट्रोलचे दुष्परिणाम आणि संभाव्य उपायांवर सविस्तर चर्चा केली जाईल.

केजरीवाल यांनी सांगितले की, या बैठकीत देशभरातून लाखो नागरिक प्रत्यक्ष आणि ऑनलाईन माध्यमातून सहभागी होतील. दिल्लीत येणे शक्य नसलेल्या लोकांसाठी 8588833548 हा ऑनलाईन संपर्क क्रमांक जाहीर करण्यात आला आहे.

## २० हजारांची लाच मागितली

चंद्रपूर (दै. संध्या): राज्यात एसीबीकडून सुरू असलेल्या धाडीत अनेक शासकीय अधिकारी, कर्मचारी लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, शिपायापासून ते जिल्हाधिकाऱ्यांपर्यंतच्या अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारत बेड्या ठोकल्याचं दिसून आलं. आता, वन विभागातील अधिकाऱ्यांनाही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून अटक केली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची भद्रावतीच्या वनक्षेत्र सहाय्यक कार्यालय कर्मचाऱ्यांवर धाड टाकण्यात आली होती. अवैध रेती वाहतूक कारवाईतील वाहन सोडवण्याकामी येथील कर्मचाऱ्यांनी 20 हजार रुपयांच्या लालेची मागणी केली होती. वनपाल-वनरक्षक आणि एक खासगी इसम अशा तिघांना एसीबीने लाच घेतल्याप्रकरणी कारवाई करत ताब्यात घेतले. या प्रकरणात तक्रारदार घराच्या कामासाठी अवैधरित्या ट्रॅक्टरमधून वाळू वाहतूक करत होता. या ट्रॅक्टरवर वनपथकाने कारवाई करत या कारवाईतील प्रक्रिया पूर्ण करून ट्रॅक्टर लवकर सोडवण्यासाठी पैशांची मागणी करण्यात आली होती. येथील भद्रावती वनपरिक्षेत्र कार्यक्रयातील वनपाल कोमल घुगलोत आणि वनरक्षक संदीप पारवे यांनी तक्रारदाराकडे 20 हजार रुपये लाच मागितली होती.

## राजकारण हा अभिजीत दिपकेचा विषय नाही

### त्याने नोकरी करावी, सुखात राहावं : दिपकेच्या कुटुंबाची भेट घेतल्यानंतर शिरसाट यांची प्रतिक्रिया

**मुंबई (दै. संध्या)**



नीट पेपरफुटीवर कॉकरोच जनता पार्टीच्या माध्यमातून आंदोलन करून धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतल्यानंतर अभिजीत दिपके हा मराठी तरूण चांगलाच चर्चेत आला. संभाजीनगरच्या असलेल्या या अभिजीत दिपकेसंबंधी राज्याचे मंत्री आणि शिवसेना नेते संजय शिरसाट यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. राजकारण हा अभिजित दिपके किंवा त्याच्या कुटुंबीयाचा विषय नाही. परंतु काही लोक अभिजीतला बळजबरीने राजकारणात आणण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप शिरसाट यांनी केला. मंत्री संजय शिरसाट यांनी रविवारी छत्रपती संभाजीनगरमध्ये राहत असलेल्या अभिजीत दिपकेच्या कुटुंबीयांची भेट घेतली होती. त्यानंतर आज त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. अभिजीत दिपकेच्या आडून काही लोक राजकारण करत असल्याचा आरोप शिरसाट यांनी केला. दिल्लीतील आंदोलन यशस्वी झाल्यानंतर अभिजीत दिपकेच्या घरी संजय शिरसाट यांनी भेट दिली. त्यावर बोलताना शिरसाट म्हणाले की, अभिजीतला मी लहानपणापासून पाहिलंय. माझा मुलगा त्याच्या बहिणीच्या हातून राखी बांधतो.दिपके हे माझे जवळचे आहे नातेवाईक आहेत आणि मतदारसंघातील आहेत. त्यामुळे त्यांची विचारपूस करणे गरजेचे वाटत होते. त्यामुळी मी अभिजीत दिपके यांच्या कुटुंबाची भेट घेतली. ते माझ्या कार्यक्रमाला येतात, मी पण त्यांच्या घरी गेलो. आंदोलन सुरू असताना जर दिपकेच्या घरी भेट दिली असती तर त्यावर चुकीच्या बातम्या आल्या असत्या. कुणाचा मेसेज घेऊन गेलो, याची चर्चा रंगली असती. त्यामुळे आंदोलन झाल्यानंतर आपण दिपकेच्या घरी भेट दिली.

अभिजीत दिपके यांनी माजी मंत्री कपिल सिब्बल यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांना विरोधी पक्षांकडून खासदारकीची ऑफर असल्याची चर्चा सुरू झाली. त्यावर प्रतिक्रिया देताना संजय शिरसाट म्हणाले की, अभिजीत दिपकेने भावनिक भरात आंदोलन केलं. पण राजकारण हा त्याचा किंवा त्याच्या कुटुंबीयांचा विषय नाही. अभिजीतने नोकरी करावी आणि सुखात राहावं असं त्याच्या आई-वडिलांची इच्छा आहे. आता राजकारणात त्याने यावं की नाही हा त्याचा निर्णय त्याने घ्यावा.

अभिजीतला राजकारणात यायचं नाही, पण काही लोक त्याला बळजबरीने राजकारणात आणण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप संजय शिरसाट यांनी केला. दिपकेच्या आडून काही लोक राजकारण करत असल्याचा आरोप शिरसाट यांनी केला. अभिजीत दिपकेने दिल्लीत आंदोलन केलं आणि त्यानंतर महाराष्ट्रात पेढे वाटले जात आहेत, हे दुर्दैवी असल्याचं संजय शिरसाट म्हणाले.

### ढिंग-टांग







## केळघर घाटात महाकाय दरड कोसळली

### वाहतूक बंद, वाहनांच्या लांबच लांब रांगा

**मुंबई (दै. संध्या)**

राज्याच्या काही भागात सध्या जोरदार पाऊस कोसळत आहे. तर काही भागात अद्यापही चांगल्या पावसाची प्रतिक्षा आहे. मुंबईसह कोकण, पुणे सातारा या भागात चांगला पाऊस झाला आहे. मुसळधार पावसामुळं काही भागात वाहतुकीला देखील अडचणी येत आहेत. अशातच सातारा-महाबळेश्वर मार्गावरील केळघर घाटातील काळा कडा परिसरात मुसळधार पावसामुळे महाकाय दरड कोसळल्याची घटना घडली आहे. मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. दरडीमुळं रस्त्यावर मोठ्या प्रमाणात दगड आणि मातीचा ढिगारा साचल्याने दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. घटनास्थळी सह्याद्री ट्रेकर्स मदतकार्यात सहभागी झाले असून, मार्ग मोकळा करण्यासाठी जेसीबीच्या सहाय्याने युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. मात्र, दरड हटवण्याच्या कामादरम्यान एक जेसीबीही दरडीत अडकल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, प्रशासनाकडे तातडीने अतिरिक्त यंत्रसामग्री आणि मनुष्यबळ पाठवण्याची मागणी करण्यात आली आहे. जोपर्यंत मार्ग पूर्णपणे सुरक्षित होत नाही, तोपर्यंत नागरिकांनी सातारा – महाबळेश्वर मार्गावरील प्रवास टाळावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. जेसीपी दरड काढण्यासाठी गेला होता तो देखील दरडीमध्ये अडकल्याची माहिती मिळत आहे. रायगड जिल्ह्यातील नेरळ माथेरान घाटात अपघात झाल्याची घटना घडली आहे. माथेरान फिरण्याकरिता आलेल्या पर्यटकांची कार तीव्र वळणावरून घसरली आहे. सुदैवाने सर्व प्रवाशी सुखरुप कोणतीही जीवितहानी झाली नाही. कारमधील चार प्रवासी जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. उल्हासनगरहून माथेरानला आलेल्या पर्यटकांचा परतीकडे जात असताना घाटातील तीव्र वळणावर अपघात झाला आहे. वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार थेट रस्त्याच्या कडेला घसरली.कार मधील चारही प्रवासी थोडक्यात बचावले. संध्याकाळी साडे सहा वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला आहे. या अपघातात वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. गोंदिया जिल्ह्यातील देवरी-आमगाव मार्गावर भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. हरदोली गावाजवळ कार चालकाचा गाडीवरचा ताबा सुटला आणि कार थेट कालव्यात जाऊन कोसळली आहे. या भीषण कार अपघातात एका वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला.

## भारताला कॉमनवेल्थ गेम्समध्ये पाचवे पदक

### ज्ञानेश्वरीने १९९ किलो वजन उचलून रौप्य पदक जिंकले, वेटलिफ्टिंगमध्ये चौथे पदक मिळाले

**ग्लासगो (दै. संध्या)**



भारताला कॉमनवेल्थ गेम्स 2026 मध्ये पाचवे पदक मिळाले आहे. ज्ञानेश्वरी यादवने महिलांच्या 53 किलो वेटलिफ्टिंग स्पर्धेत एकूण 199 किलो (88 किलो स्नॅच + 111 किलो क्लीन अँड जर्क) वजन उचलून रौप्यपदक पटकावले. यासोबतच वेटलिफ्टिंगमधील भारताचे हे चौथे आणि एकूण पाचवे पदक ठरले.

यापूर्वी रविवारी मीराबाई चानूने महिलांच्या 48 किलो गटात 190 किलो (85+105) वजन उचलून भारताला या खेळांमधील पहिले सुवर्णपदक मिळवून दिले होते. चानूने सलग तिसऱ्यांदा कॉमनवेल्थ गेम्सचे सुवर्णपदक जिंकले. यापूर्वी तिने 2018 च्या गोल्ड कोस्ट आणि 2022 च्या बर्मिंगहॅम गेम्समध्येही सुवर्णपदक जिंकले होते. 2014 च्या ग्लासगो गेम्समध्ये तिने रौप्यपदक जिंकले होते. भारताला वेटलिफ्टिंगमध्ये आणखी दोन रौप्यपदकेही मिळाली आहेत. ऋषिकांत सिंगने पुरुषांच्या 60 किलो गटात 264 किलोग्राम (121+143) वजन उचलून रौप्यपदक जिंकले, तर राजा मुथुपांडीने पुरुषांच्या 65 किलो गटात 286 किलोग्राम (126+160) वजन उचलून रौप्यपदक पटकावले. याशिवाय, झंडू कुमारने पॅरा पॉवरलिफ्टिंगमध्ये कांस्यपदक जिंकून भारताचे खाते उघडले होते. भारत पदक तालिकेत 8व्या स्थानावर पोहोचला. ऑस्ट्रेलिया 17 सुवर्ण पदकांसह एकूण 39 पदकांसह पहिल्या स्थानावर आहे. कॉमनवेल्थ गेम्सच्या राऊंड ऑफ 16 सामन्यात भारतीय बॉक्सर सचिन सिवाचने इंग्लंडच्या विल्यम हेविटला 4-1 च्या फरकाने हरवले. तो पुरुषांच्या 60 किलो वजनी गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचला. पाचपैकी चार पंचांनी सचिनच्या बाजूने निर्णय दिला. चार पंचांनी सचिनला 29-27 ने विजेता घोषित केले. तर एका पंचाने 29-27 च्या गुणांसह हेविटला सरस मानले. उपांत्यपूर्व फेरीत त्याचा सामना बोत्सवानाच्या ट्रेझर मोरेमीशी होईल.

भारताचा लांब उडीचा खेळाडू मुरली श्रीशंकर अंतिम फेरीत पोहोचला आहे. पात्रता फेरीदरम्यान, श्रीशंकरने आपल्या पहिल्याच उडीत 8.01 मीटर अंतर कापून अंतिम फेरीत स्थान मिळवले. 2022 च्या बर्मिंगहॅम राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत श्रीशंकरने रौप्य पदक जिंकले होते. अंतिम फेरीसाठी पात्र होण्यासाठी 8 मीटर अंतर कापणे आवश्यक होते. जलतरणपटू साजन प्रकाश पुरुषांच्या 200 मीटर बटरफ्लायच्या अंतिम फेरीत पोहोचले आहेत. साजन प्रकाशने हीट 2 मध्ये 1:58.59 वेळेसह दुसरे स्थान पटकावले, जे त्याच्या 1:57.09 च्या वैयक्तिक सर्वोत्तम (PB) वेळेपेक्षा थोडे जास्त होते. ते रात्री 1:44 वाजता होणाऱ्या अंतिम फेरीत पदकासाठी आव्हान देतील.

## संपादकीय

# तिसऱ्या मुंबईच्या तटावर

मुंबईतून कोकणाकडे जाताना पनवेल पार केल्यावर पूर्वी कर्नाळा हा सुखावह हिरवागार मार्ग असायचा. पाताळगंगा नदी ओलांडताना डावीकडे एक नागमोडी वाट नदीपात्राच्या कडेकडेने आपटा, रसायनी या मनोरम गावांकडे जायची. खारपाड्यातला कमानींचा पूल म्हणजे हमखास वाहतूक कोंडी. तो पार केल्यावर पेणकडे जाईपर्यंत सभोवतीच्या डोंगरांवर पावसाळ्यात काकड्या, श्रावणी भेंडे आणि इतर पावसाळी भाज्यांची लागवड लक्ष वेधून घ्यायची. चिरनेर, हमरापूर, वडखळ परिसरात थोडेफार जंगल, खाजण जमिनी, मिठागरे यांच्या सान्निध्याने किनारपट्टीची चाहूल जाणवायची. आता हा परिसर स्थित्यंतराच्या उंबरठ्यावर असून तिसऱ्या मुंबईची बिजे तिथे रोवली जात आहेत. त्या पाऊलखुणा काही टोलेजंग मनोरे, टाऊनशीप यांच्या रूपांत दिसूही लागल्या आहेत. या आव्हानांना नगरनियोजनाच्या कसोटीवर आपण कितपत सज्ज आहोत, हा प्रश्न आहे.

कर्नाळा, साई, चिरनेर या परिसरात ही तिसरी मुंबई वसविली जाणार आहे. पेण, खोपोली या परिसरापर्यंतही तिचा विस्तार अपेक्षित आहे. त्यात निवासी संकुलांप्रमाणेच लॉजिस्टिक्स म्हणजेच बंदर-विमानतळ, मालाची आयात-निर्यात-वितरण यांना आधारभूत सेवा यांचे जाळे या परिसरात विणले जाणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि अटल सेतूदरम्यानच्या ३२४ चौरसकिलोमीटर क्षेत्रातील तिसऱ्या मुंबईसाठी सिंगापूरच्या एका कंपनीस बृहद्आराखडा तयार करण्याचे काम दिल्याचेही मध्यंतरी जाहीर झाले आहे. पनवेल, पळस्पे, कर्नाळा, चिरनेर, पेण हे तिसऱ्या मुंबईचे तट मानले, तर तिथले सध्याचे चित्र काय आहे, याकडे नियोजनकर्त्यांनी एकदा नजर टाकायला हवी. पनवेलमधून रस्त्याने बाहेर पडताना रेल्वेपुलाखाली दर पावसाळ्यात तळे



तयार होते. पळस्प्याचे वळण तसेच कर्नाळा घाटाचा प्रारंभ इथे पूर्वी कधी पाणी साचायचे नाही, तिथे आता जलसंचयाची नवी केंद्रे तयार झाली आहेत. खारपाड्याचा पूर्वीच्या कमानीच्या पुलाऐवजी आता दुतर्फा नवे पूल झाले आहेत. परंतु इथे सायंकाळच्या वेळी वाहतूक कोंडीचे नवे स्पॉट तयार झाले आहेत. प्रकल्पांसाठी दगड, मातीची गरज असल्याने सभोवतीचे डोंगर भुईसपाट होत आहेत व चिरनेर रस्ता पावसाळ्यात साचलेले पाणी आणि उन्हाळ्यात धुळीचे साम्राज्य यांनी ओळखला जाऊ लागला आहे. प्रगतीची काही चिन्हे म्हणजे येथील कंटेनर यार्डांमध्ये देशभरातील माल उतरवला जात आहे. पळस्पे ते कळंबोली, अटलसेतूपर्यंत नैना, पुष्पकनगर तसेच इतर संकुलांचे टोलेजंग मनोरे डोंगराला खेटून उभे आहेत. त्यांच्या मार्गावर फर्निचर, गृहसामग्रीच्या खोपट्यांची गर्दी दाटली आहे. शीळफाटा, डोंबिवली, भिवंडी यांच्याप्रमाणेच येथेही बेशिस्त परिस्थितीचा ज्वालामुखी आपण उभा करणार का? सर्व गोष्टी नव्याने उभ्या राहत असताना त्यांच्यापैकी कुणाची जागा कुठे आहे (इफेक्टिव्ह लँड यूज), पाण्याचा निचरा कसा करायचा, पिण्याचे पाणी कुठून येणार, याचे नियोजन समोर आलेले नाही. या परिसरात नेमके कोणत्या क्षेत्रात रोजगार तयार होणार, त्यासाठी स्थानिकांना प्रशिक्षण देण्याची योजना आहे का, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनींचे भूसंपादन केले आहे, त्याबदल्यात कोणत्या पायाभूत सुविधा दिल्या जाणार, असे बरेच प्रश्न धसास लावावे लागतील. हा परिसर रायगड जिल्ह्यात येतो आणि जिल्ह्यातील महनीय खासदार, मंत्री, आमदार हे पालकमंत्रिपद कोणाकडे हवे, या वादात गुरफटलेले आहेत. शेलक्या भाषेत एकमेकांचा समाचार घेत आहेत; परंतु तिसऱ्या मुंबईतील या तटांचे भरभक्कम नियोजन करण्याविषयी त्यांनी अवाक्षरही काढलेले नाही.

## संस्कृत सुभाषित

आत्मानमेव मन्येत कर्तारं सुखदु:खयो:।
तस्माच्छ्रेयस्करं मार्ग प्रतिपद्येत् न त्रसेत्।।

अर्थ : आरोग्य आणि आजार, सुख आणि दु:ख यांचे निर्माते आपणच असतो. म्हणून इष्ट व श्रेयस्कर मार्गच नेहमी स्वीकारावा म्हणजे त्रास होत नाही.

## गुरु वचन

### नशिबात असेल तेच मिळेल

एका गावात सोमिलक नावाचा कष्टाळू कोष्टी होता. तो तलम कापड विणण्यात पटाईत होता. पण कष्ट भरपूर करूनसुद्धा अपेक्षित मोबदला त्याच्या हाती येत नव्हता. त्याच्या बरोबरचे इतर कोष्टी जाडंभरडं कापड विणूनसुद्धा भरपूर पैसा कमवित होते.

सोमिलकाने दुसऱ्या गावी जाऊन धंदा करण्याचे ठरविले. पण सोमिलकाची बायको त्याला म्हणाली, ''कशाला उगाच दुसऱ्या गावात जाता.... आपल्या नशिबात भरपूर पैसा मिळणार असेल तर याच ठिकाणी कापड विणून मिळेल. पण नशिबात जर नसेल तर दुसऱ्या गावी जाऊनही उपयोग काय?'' तरी हट्टाने सोमिलक दुसऱ्या गावी जातो. भरपूर कष्ट करतो आणि तिनशे मोहरा कमावतो.

त्या मोहरा घेऊन आपल्या गावी येण्यास निघतो. दमल्यामुळे एका झाडाखाली विश्रांती घेता घेता त्याला झोप लागते. थोड्यावेळाने दोन माणसांच्या संभाषणाच्या आवाजामुळे झोप उडते. त्या दोघांचे संभाषण सोमिलक ऐकतो.

''अरे, कर्त्या... सोमिलकाने आता तीनशे मोहरा कमावल्या पण त्याच्या नशिबात फक्त अन्नवस्त्रापुरताच पैसा आहे'' कर्म विचारतो. त्याबरोबर कर्ता उद्गारतो, ''त्याने कष्ट केले त्याचे फळ मी दिले. ते फळ त्याच्याकडे ठेवायचे की नाही हे तुझं काम!''

दे घोघेजण सोमिलकाचे कर्म आणि कर्ता असतात. सोमिलक पूर्ण जागा होऊन आपली मोहरांची पिशवी बघतो तर ती रिकामी असते!

## उपदेशकथा

### हृदयाचा खंबीरपणा

महात्मा गांधी आफ्रिकेत असतानाची ही गोष्ट. एक दिवस त्यांच्या नावाची तार आली. त्या तारेत त्यांचे थोरले बंधू श्री. लक्ष्मीदास हे ८ मार्च १९१४ ला पोरबंदरला वारल्याचं कळवलं होता! ती तार गांधीजींनी वाचली, अन लगेच दुसऱ्याजवळ दिली, ती वाचून तिथल्या त्यांच्या सगळ्या चाहत्यांना फार वाईट वाटलं. पण गांधीजींचं अंत:करण होतं खंबीर. त्यांचा 'साह्यकर्ता दादा' गेल्याचं ते दु:खदायक तर होतंच होतं. पण तरीही गांधीजींच्या नित्याच्या क्रमात काही खंड पडला नाही. आपलं काम रोजच्या सारखं ते संध्याकाळपर्यंत करीत राहिले. दररोज संध्याकाळी प्रार्थना ठरलेली. ती आटपली अन् सगळे जण गांधीजींकडे पाहतात, तो त्यांचा कंठ दाटून आला! डोळेही आसवांनी डबडबलेच. पण ते दु:ख गिळून, ते सर्वांना म्हणाले, 'मी दिवसभर बोललो नाही, पण माझे वडील बंधु गेल्याची ती तार वाचली अन् मला अतिशय दु:ख झालं. पण काही झालं तरी, आपलं दैनंदिन काम हे चाललंच पाहिजे. त्यात खंड पडू देणं योग्य नाही. म्हणूनच या वेळपर्यंत मी कुणालाच काही सांगितलं नाही. मृत्यू हा ईश्वराधीन असतो. पण आपलं काम मात्र आपल्या स्वाधीनच.

कथा उपदेश : स्वकर्म सतत करीत राहणं हीच ईश्वराची खरी पूजा होय.

## पंचांग

पंचांग
२८ जुलै २०२६
मंगळवार
विक्रम संवत्– २०८२
आषाढ शके
संवत्– १९४८
संवत्सर – पराभवनाम
अयन– दक्षिणयन
मास– आषाढ
ऋतु– सौर वर्षा
शुक्ल पक्ष
तिथि:चतुर्दशी १८:१९:१३
नक्षत्र:पूर्वाषाढा
१३:१०:४४

योग:विष्कुम्भ २३:३२:४५
करण:वणिज १८:१९:१३
करण:विष्टि (अहोरात्र)
सूर्य:कर्क
चन्द्र:मकर१९:४८:५७
हिजरी सन् – १४४८
मुस्लिम मास – सफर
तारीख – १३
विशेष
साईबाबा उत्सव
प्रारंभ – शिर्डी
संत मामा दांडेकर
पुण्यतिथी
पौर्णिमा प्रारंभ सायं ६.१८

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०२३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | | 7 | 1 | | 9 | 3 |
| 5 | 3 | 1 | 6 | | | | | |
| | | 7 | 3 | | | | 5 | 8 |
| 3 | | 9 | 1 | | | | | |
| | 7 | 8 | | | | 5 | 6 | |
| | | | | | 5 | 3 | | 7 |
| 7 | 2 | | | | 8 | 4 | | |
| | | | | | 6 | 8 | 7 | 5 |
| 8 | 1 | | 7 | 4 | | | | 6 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०२२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 9 | 3 | 7 | 2 | 6 | 4 | 8 | 5 |
| 4 | 6 | 2 | 5 | 1 | 8 | 3 | 9 | 7 |
| 7 | 5 | 8 | 9 | 4 | 3 | 2 | 6 | 1 |
| 6 | 8 | 1 | 4 | 3 | 2 | 5 | 7 | 9 |
| 5 | 7 | 4 | 6 | 8 | 9 | 1 | 2 | 3 |
| 2 | 3 | 9 | 1 | 7 | 5 | 8 | 4 | 6 |
| 9 | 4 | 6 | 8 | 5 | 1 | 7 | 3 | 2 |
| 8 | 2 | 5 | 3 | 9 | 7 | 6 | 1 | 4 |
| 3 | 1 | 7 | 2 | 6 | 4 | 9 | 5 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १४९३ – मॉस्को शहराचा मोठा भाग आगीत भस्मसात.
- १५४० – दरबारी राजकारणात इंग्लंडचा राजा हेन्री आठव्याने थॉमस क्रॉमवेलला मृत्युदंड दिला.
- १७९४ – फ्रेंच क्रांती – मॅक्सिमिलियें रॉबिस्पियरेला गिलोटिनवर मृत्युदंड.
- १८२१ – पेरूने स्वत–लास्पेनपासून स्वतंत्र जाहीर केले.
- १९१४ – पहिले महायुद्ध – ऑस्ट्रिया–हंगेरीने सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले.
- १९३० – आर.बी. बेनेट कॅनडाच्या पंतप्रधानपदी.

### राष्ट्रीय

- १९८८ – बॅडमिंटनपटू सईद मोदीचा खून.
- २००७ – भारत व भुतानने आपल्या द्विपक्षीय संबंधांना नवीन ऊर्जा देत एका महत्त्वाकांक्षी जलविद्युत योजना करारावर स्वाक्षरी केली.

### जन्म

- १८९१ – रॉन ऑक्सनहॅम, ओस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १९०७ – अर्ल टपर, टपरवेरचा इंग्लिश शोधक.
- १९२९ – जॅकलीन केनेडी–ओनासिस, जॉन एफ. केनेडीची पत्नी.
- १९३१ – जॉनी मार्टिन, ओस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १९३६ – सर गारफील्ड सोबर्स, वेस्ट इंडियन क्रिकेट खेळाडू.
- १९४५ – जिम डेव्हिस, अमेरिकन व्यंगचित्रकार.
- १९५४ – ह्युगो चावेझ, व्हेनेझुएलाचा राष्ट्राध्यक्ष.

### निधन

- ४५० – थियोडॉसियस, पवित्र रोमन सम्राट.
- १०५७ – पोप व्हिक्टर दुसरा.
- १७९४ – मॅक्सिमिलियें रॉबिस्पियरे, फ्रेंच क्रांतीकारी.
- १८४९ – चार्ल्स आल्बर्ट, सार्डिनियाचा राजा.

## : SMS :

Doctor: Beta tumhe kya hua?
Baccha: Doctor sahab, mujhe mobile dekhne ki bimari hai.
Doctor: Wo kaise?
Baccha: Jab tak mobile nahi dekhta, chain nahi aata.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.५ | २३.९ |
| अहमदनगर | ३०.८ | २३.४ |
| अकोला | ३७.२ | २६.४ |
| अमरावती | ३६.९ | २६.१ |
| बीड | ४०.१ | २७.५ |
| भंडारा | ३७.२ | २६.७ |
| बुलढाणा | ४३.१ | ३१.७ |
| चंद्रपूर | ३९.१ | २७.४ |
| चेन्नई | ४०.२ | ३१.९ |
| नवी दिल्ली | ४३ | ३४.३ |
| धुळे | ३५.६ | २५.७ |
| गोंदिया | ३५.१ | २६.६ |
| जळगाव | ३७.२ | २६.१ |
| कोल्हापूर | ३०.४ | २३.२ |
| लातूर | ३२.६ | २४.१ |
| मुंबई | ३४.५ | ३०.४ |
| नागपूर | ३६.८ | २६.७ |
| नांदेड | ३५.७ | २५.७ |
| नंदूरबार | २९.९ | २५ |
| नाशिक | २७.३ | २४ |
| पुणे | २७.२ | २२.९ |
| पंढरपूर | ३५.२ | २४.१ |
| सातारा | ३१.४ | २३.२ |
| सांगली | ३१.७ | २३.५ |
| सोलापूर | ३५.९ | २४.१ |
| वर्धा | ३८.२ | २६.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग :जांभळा, शुभ दिशा :पश्चिम सामाजिक मान सन्मान मिळाल्याने आनंदी रहाल.

**वृषभ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: उत्तर प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल.

**मिथुन :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: पश्चिम आर्थिक बाबतीमधील प्रकरणे सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी दिवस शुभ आहे.

**कर्क :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत.

**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल.

**कन्या :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा: उत्तर जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा.

**तुळ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा:पूर्व व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल.


**धनु :** शुभ रंग :निळा,शुभ दिशा:पश्चिम कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकार्य कमी प्रमाणात मिळेल.

**मकर :** शुभ रंग:लाल,शुभ दिशा: उत्तर व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे.

**कुंभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील. कामकाजात बदल होण्याची शक्यता आहे.

**मीन :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०२३



### आडवे शब्द

१. मुस्लीम शासनकर्ते
३. सोमवारची अमावस्या
६. नंतर
८. नेहमी
११. मुमताज बेगमची कबर
१३. थांबून थांबून केलेला प्रवास
१६. नम्र वाकलेला
१८. एक नदी
२०. फणसाचा एक प्रकार
२१. घ्राणेंद्रिय
२२. उष्ण
२५. मत देणारा
२६. कलंक
२७. एक कडू फळ, हिदीत कूस
२८. पेन ठेवण्याची पेटी
२९. मोठी बहीण
३०. मज्जाव
३१. खासगी
३४. वरपांगी
३७. हाताचा तळवा
४१. श्रीकृष्णाचे एक नाव
४४. फिकीर, काळजी
४५. उष्णतेने पायाला भेगा पडण्याचा रोग
४६. सोन्याचा धागा
४७. बेडर
४८. तोंडी करार
५०. जल
५१. सोन्या–चांदीचा व्यापारी
५२. महिला, स्त्री
५३. मृत्यू, वेळ
५१. बाण
५६. पटल
५७. कोवळ्या दुधाचा पदार्थ
५८. देखत, समोर
६०. रविवार
६३. कापणे
६४. खिन्न, कष्टी, निरपेक्ष
६६. चिता
६७. मोठी नदी
६९. भिस्त
७०. वेळेवर हजर असणाऱ्याला मिळणारे पद
७१. किराणा व्यापारी
७२. धपाटा
७३. चांदण्याचा ऋतू
७४. करवंद
७५. स्नान न केलेला
७६. नाविक दल
७७. लावलेला पिंजरा
८०. पोळ्या भाजण्याचे साधन
८१. लाख
८२. झकास, सुंदर
८३. डोळ्यावरील उघडझापीचा अवयव

### उभे शब्द

१. रानावनात वाढलेला गोष्टीतील मुलगा
२. वेल
३. चंद्र
४. मोठा, प्रचंड
५. वर्तुळ
६. मला
७. जहाज
८. 'नटसम्राटाची' पत्नी
९. किंमत
१०. नीच
१२. कोळिष्टकावरील कचरा
१३. मज्जाव
१४. किंमत
१५. संत नामदेवांची शिष्य
१७. शहर
१९. हटकून
२३. बारीक झणझण
२४. उगीच
२५. मनाचा आधीन असलेला
२६. सुताराचे हत्यार
२९. ताठ स्वभावाचा
३२. जेव्हा
३३. किरकोळ सामान
३५. रमापती
३६. मांडणी, सजावट करणारा
३८. चंद्र
३९. बूड
४०. मध्यस्थ
४२. गणक, मोजणी करणारा
४३. प्रत्येक, मूल्य
४७. 'क्ष्मी वंदिले, धारातीर्थी तप ते आचरिती'
४९. सततची हालचाल
५०. झाडावर पिकू लागलेले फळ
५१. सुकुमार
५२. बारसे
५५. रसाळ
५६. पंधरवडा, बाजू
५७. खोदकाम
५९. चामखीळ
६१. विसराळू
६२. उत्सवाचे, सणाचे दिवस
६४. सोडवून दाखविलेले गणित, नमुना
६५. दुर्दशा
६८. प्रत्येक वर्षी
७३. लाज
७५. बासरी
७८. अर्धी ओंजळ
७९. राजपत्नी

### जम्बो शब्दकोडे क्र. १०२२ चे उत्तर

आडवे उत्तर १.सावकाश ३.कपार ६.'कोसला'कार १०.हायसे वाटणे ११.पाप १२.गरागरा १५.आपसूक १७.लप १९.नजर २०.नटराज २१.ठोकर २२.मलमल २५.तासभर २८.गालफड २९.नगारा ३०.सावयव ३२.रमाधाम ३३.समय ३४.पाळत ३५.अंबाबाई ३७.तडक ३९.नवस ४१.नंदलाल ४४.जल ४६.बाक ४७.लहान ४९.कलाकार ५१.लाजिरवाणे ५३.विलोभनीय ५४.रजनी ५६.नवनीत ६०.करवंद ६२.तट ६३.षटक ६५.बाजारगप ६७.खळगा ६८.रण ६९.सरपण ७०.माल ७१.जसे ७३.आमरस ७६.तव ७७.नामधारी ७८.सरतेशेवटी

उभे उत्तर : १.साष्टांग नमस्कार विनंती विशेष २.शहारा ३.कसेसे ४.पावा ५.रटरट ७.सटीप ८.काटक ९.आपपरभाव ११.पालक १३.राज १४.गरम १५.आजतागायत १६.सुलभ १९.कोमल २३.लगाम २४.लफडेबाज २६.सरा २७.रसाळ २९.नम ३१.वतनदार ३३.सई ३४.पाककला ३६.बालक ३८.डबा ४०.सजणे ४२.लालभडक ४३.लहानी ४५.नकार ४८.नयनबाण ५०.रजक ५२.वाजतगाजत ५५.नीरज ५७.वजा ५८.नीरस ५९.तगर ६१.दखल ६४.टकमक ६६.पपनस ६८.रसना ७२.सेवक ७४.वांधा ७५.जाते

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या जयंतीनिमित्त मूकबधिर लोकांना खाऊवाटप

**पुणे : दैनिक संध्या**

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे कॅन्टोन्मेंट तर्फे कॅम्प शरबत वाला चौक येथे गरीब गरजू मूकबधिर लोकांना खाऊ वाटप करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे कॅन्टोन्मेंट ब्लॉक अध्यक्ष दिनेश अर्दाळकर व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे शहर उपाध्यक्ष दिनेश परदेशी यांनी केले. यावेळी राष्ट्रवादी पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा अध्यक्ष नरेश जाधव, हरीश लडकत, महेंद्र लालबिगे, अयाज शेख, अतुल जाधव, नीताताई गायकवाड, सीमा साळवे, फरदीन पटेल, रीना अडागळे, सुनिता बडेकर, अलीम शेख, नईम शेख, अखिल सय्यद, उमेश परदेशी, दीपक म्हस्के, महेश गोंडाले, आदी उपस्थित होते.

### 'विशेष गौरव पुरस्कार'; १५ सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे : दैनिक संध्या**

विविध क्षेत्रात उल्लेखनीय व अतिउत्कृष्ट कार्य करणाऱ्या माजी सैनिक, त्यांच्या पत्नी व पाल्यांचा एकरकमी विशेष गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, पुणे यांनी दिली आहे. तसेच पात्र लाभार्थ्यांनी १५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजेपर्यंत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत, असे आवाहनही त्यांनी केले आहे. या विशेष गौरव पुरस्कारांतर्गत खेळ, साहित्य, संगीत, गायन, वादन, नृत्य, नैसर्गिक आपत्तीमध्ये बहुमोल कामगिरी, सामाजिक कार्य, पर्यावरण संवर्धन आदी क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यात येणार आहे. शैक्षणिक क्षेत्रात सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वीमध्ये ९० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक, तसेच १२ वीमध्ये ८५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविणारे विद्यार्थी, पदवी अथवा पदव्युत्तर परीक्षेत विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळविणारे माजी सैनिकांचे पाल्य, तसेच IIT, IIM, AIIMS यांसारख्या नामांकित राष्ट्रीय संस्थांमध्ये प्रवेश मिळविणाऱ्या माजी सैनिकांच्या पाल्यांनाही विशेष गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय यशस्वी उद्योजकांचाही सन्मान करण्यात येईल. या पुरस्कारासाठीचा विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, पुणे येथे उपलब्ध असून, पात्र माजी सैनिक, माजी सैनिकांच्या पत्नी तसेच माजी सैनिकांच्या विधवांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज निर्धारित मुदतीत कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर एस. फिरासत (नि.) यांनी केले आहे.

### माजी सैनिकांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती योजना; अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे जिल्ह्यातील माजी सैनिक, तसेच माजी सैनिकांच्या विधवांच्या पाल्यांसाठी कल्याणकारी निधीमधून शिष्यवृत्ती योजना २०२६-२७ राबविण्यात येत असून, पात्र विद्यार्थ्यांनी १५ सप्टेंबर २०२६ पूर्वी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, पुणे यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत सन २०२५-२०२६ मध्ये इयत्ता १० वी, १२ वी किंवा पदवी परीक्षा ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुणांनी उत्तीर्ण होऊन पुढील शिक्षण घेत असलेल्या माजी सैनिक व माजी सैनिकांच्या विधवांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार आहे. शिष्यवृत्तीसाठीचे अर्ज जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, पुणे येथे उपलब्ध आहेत. संबंधित माजी सैनिक किंवा माजी सैनिकांच्या विधवांनी आपल्या पाल्यांचे अर्ज आवश्यक कागदपत्रांसह १५ सप्टेंबर २०२६ पूर्वी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात सादर करावेत, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर एस. फिरासत (नि.) यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते समाजगुरूंचा सन्मान

**पुणे : दैनिक संध्या**




विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवलेल्या, समाज अधिकाधिक ज्ञानशील, कर्मशील व्हावा म्हणून कार्यरत असलेल्या विविध क्षेत्रातील समाजगुरुंचा प्रातिनिधीक स्वरुपात गुरूपौर्णिमेनिमित्त सन्मान करण्यात येणार आहे. विद्या प्रबोधिनी आणि पुनर्निर्माण सोशल फाऊंडेशनच्या वतीने येत्या शुक्रवारी (३१ जुलै) होणाऱ्या कार्यक्रमात महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते समाजगुरूंना सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये - ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ आणि नोबेल पुरस्काराचे सहमानकरी डॉ. राजेंद्र शेंडे, डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. भूषण पटवर्धन, लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंभोरकर, पुण्यातील पहिले कंपनी सचिव आणि पुणे सार्वजनिक सभेचे उपाध्यक्ष डॉ. अरविंद नवरे, ज्येष्ठ लेखक- संपादक आनंद हर्डीकर, लेखिका आणि अनुवादक मृणालिनी सावंत, लेखक-दिग्दर्शक आणि गायक आनंद माडगूळकर, प्रख्यात शिल्पकार प्रमोद कांबळे, इतिहास संशोधक अनुराधा कुलकर्णी आणि ग्रंथप्रसारक व 'रुरल रिलेशन्स'चे प्रमुख प्रदीप लोखंडे यांचा सन्मान ना. चंद्रकांतदादांच्या हस्ते होणार आहे. या उपक्रमाचे हे चौथे वर्ष असून ३१ जुलै रोजी संध्याकाळी ५.३० वाजता बालशिक्षण मंदिर सभागृह, मयूर कॉलनी, कोथरूड येथे होणाऱ्या या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

### पुणे जिल्हा परिषदेचे ३३३ कोटींचे पुरवणी अंदाजपत्रक मंजूर

**पुणे : दैनिक संध्या**

जिल्हा परिषदेच्या २०२६-२७ आर्थिक वर्षाच्या ३३३ कोटी रुपयांच्या पुरवणी अंदाजपत्रकाला सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली. यामुळे मार्चमध्ये मंजूर झालेल्या ३०१ कोटी रुपयांच्या मूळ अंदाजपत्रकात ३२ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. पुरवणी अंदाजपत्रकातून कृषी, शिक्षण, आरोग्य तसेच महिला व बालकल्याण विभागांच्या विविध योजनांसाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी सर्वसाधारण सभा झाली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, सभापती जितेंद्र बडेकर, अमोल नलावडे, अंकिता पाटील-ठाकरे, दीपाली हुलावळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत खरात यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

# ५९ जातींचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला मोर्चा

**'जनगणनेनंतरच अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करण्याची 'महामोर्चाद्वारे रिपब्लिकन पक्ष (आठवले) ची आग्रही मागणी**

■ **पुणे (दै. संध्या)**

अनुसूचित जातीमध्ये उपवर्गीकरण करण्याचा निर्णय राष्ट्रीय जातनिहाय जनगणनेनंतरच अचूक लोकसंख्येच्या प्रमाणानुसार अमलात आणावा, या मागणीसाठी रिपब्लिकन पक्ष आठवले गटाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया नजीकच्या आंबेडकर पुतळ्यापासून भव्य महामोर्चा काढण्यात आला. पक्षाचे पुणे शहर, पिंपरी चिंचवड शहर आणि पुणे ग्रामीण जिल्हयातील पदाधिकारी, कार्यकर्ते व ५९ जातींमधील नागरिक भर पावसात उत्साहाने या मोर्चात सहभागी झाले.



या मोर्चात पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, पिंपरी चिंचवड अध्यक्ष कुणाल न्हावळकर, पुणे जिल्हा अध्यक्ष श्रीकांत कदम, महिला आघाडी अध्यक्ष चंद्रकांता सोनकांबळे, प्रदेश उपाध्यक्ष हुलगेश चलवादी, बाळासाहेब भागवत, संगीता आठवले प्रदेश सचिव सूर्यकांत वाघमारे, कार्याध्यक्ष बसवराज गायकवाड, सरचिटणीस महिपाल वाघमारे, नगरसेविका हिमाली कांबळे, सरचिटणीस श्याम सदाफुले, पुणे जिल्हा कार्याध्यक्ष शिवाजीराव मखरे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शशिकला आठवले, कालिदास गायकवाड, अर्जुन आल्हाट, विनोद टोपे, संतोष खरात, मंगल रासगे, सुन्नाबी शेख, शोभा झेंडे, मीना गालटे, चांदणी गायकवाड, मीनाज मेमन, वसंत वाघमारे, क्रिस्टोपर राजमनी, डोर्थी थॉमस, संदीप धाडोरे, आशिष भोसले, सशाक माने, अविनाश कादम, अविनाश गायकवाड, अंकिता भालेराव, रेशमा शेख, शिवाजी उजागरे, संजय पटणपल्लू, विशाल शेळके, उमेश कांबळे, प्रवीण ओव्हाल, आकाश बहुले, भारत पवार, सुनिल गवळी, अक्षय अवसरमल, फिरोज खान, निलेश रोकडे, हनुमंत गायकवाड, अतुल भालेराव, नारायण गायकवाड, सशाक माने, मिलिंद बनसोडे, हर्षा लोंढे, हर्षा गायकवाड, अयुब जहागीरदार, संग्राम साळवे, संग्राम घंगाले, सुनिल नाईकनवरे, दिनेश नहारिया, बापू बाराथे, अभिमन्यू सूर्यवंशी, सुदर्शन कांबळे, गौतम कदम, मिट्टू वाघमारे, ईश्वर ओव्हाळ, सिकंदर सूर्यवंशी, यांच्यासह कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. बौद्ध समाज आणि इतर अनुसूचित जाती जमाती मधील ऐक्य व्यक्त करणाऱ्या घोषणा या मोर्चात देण्यात आल्या. अनुसूचित जातींतील ५९ समाजघटकांमध्ये सामाजिक ऐक्य टिकवून ठेवणे ही रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)ची ठाम भूमिका आहे. उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेमुळे कोणत्याही समाजघटकात मतभेद किंवा दुरावा निर्माण होऊ नये, यासाठी ती प्रक्रिया राष्ट्रीय जातीय जनगणना पूर्ण झाल्यानंतरच राबविण्यात यावी. जनगणनेतील लोकसंख्येच्या अचूक आकडेवारीच्या आधारेच न्याय्य निर्णय घेणे शक्य होणार आहे. अनुसूचित जातींतील विविध समाजघटकांनी सामाजिक न्याय, समान हक्क आणि आरक्षणासाठी अनेक दशकांपासून एकत्रितपणे संघर्ष केला आहे. त्यामुळे कोणताही निर्णय घाईघाईने घेण्याऐवजी वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे घेणे आवश्यक आहे. प्रत्येक जातीची अचूक लोकसंख्या जनगणनेतून समोर आल्यानंतरच उपवर्गीकरणाबाबत धोरण निश्चित केल्यास सर्व समाजघटकांना न्याय मिळू शकेल. राज्यातील उर्वरित ५८ अनुसूचित जातींनाही शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये समान संधी मिळाव्यात, ही पक्षाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच २०२७ च्या जनगणनेनंतर लोकसंख्येच्या प्रमाणानुसार आरक्षणाच्या रचनेचाही पुनर्विचार करण्यात यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

> अनुसूचित जाती मधील 59 समाज घटकांची अचूक लोकसंख्या माहीत नसताना उपवर्गीकरणाची अंमलबजावणी झाल्यास या समाज घटकांमध्ये रोष उत्पन्न होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनुसूचित जातींमधील ऐक्य आणि सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यासाठी जनगणने नंतर लोकसंख्येच्या प्रमाणात उपवर्गीकरण करण्याची मागणी या मोर्चाद्वारे अधोरेखित करण्यात आली.

# डॉ. बत्राज्च्या शिवाजीनगर क्लिनिकचा रौप्यमहोत्सव उत्साहात

■ **पुणे (दै. संध्या)**

> ■ पुण्यातील आरोग्यसेवेची २५ वर्षे पूर्ण; केस व त्वचेसाठी नव्या उपचारपद्धतींची माहिती

डॉ. बत्राज् हेल्थकेअरच्या पुण्यातील शिवाजीनगर क्लिनिकने आरोग्यसेवेची २५ वर्षे पूर्ण केली असून, त्यानिमित्त रौप्यमहोत्सवी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या गेल्या २५ वर्षांतील वाटचालीचा आढावा घेण्यासह विविध उपचारपद्धतींची माहिती देण्यात आली. या सोहळ्याला डॉ. बत्राज्चे संस्थापक व चेअरमन एमेरिटस पद्मश्री डॉ. मुकेश बत्रा यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर, रुग्ण आणि हितचिंतक उपस्थित होते. रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त केस आणि त्वचेशी संबंधित काही नव्या उपचारपद्धती सादर करण्यात आल्या. यामध्ये ५० अब्ज एक्सोसोम्सवर आधारित 'हेअरगेन' केस पुनर्वृद्धी उपचाराचा समावेश आहे. आनुवंशिक टक्कलपणा, तणावामुळे होणारी केसगळती तसेच प्रसूतीनंतर आणि रजोनिवृत्तीनंतर उद्भवणाऱ्या केसांच्या समस्यांसाठी ही उपचारपद्धती विकसित करण्यात आल्याचे संस्थेकडून सांगण्यात आले.



यासोबतच एक्सोसोम तंत्रज्ञान आणि होमिओपॅथीचा समावेश असलेली त्वचा पुनरुज्जीवन उपचारपद्धतीही सादर करण्यात आली. त्वचेवरील काळे डाग, सुरकुत्या, वृद्धत्वाची लक्षणे आणि त्वचेच्या असमान पोताशी संबंधित समस्यांवर या पद्धतीद्वारे उपचार केले जात असल्याची माहिती देण्यात आली.

श्वसनविकारांसाठी 'ऑक्सीलंग', ॲलर्जी व्यवस्थापनासाठी 'ॲलरगोन', मधुमेह नियंत्रणासाठी 'बीफिट शुगर कंट्रोल', वजन व्यवस्थापनासाठी 'बीफिट वेट कंट्रोल', मानसिक आरोग्यासाठी 'माइंडफिट' तसेच पीसीओएस व्यवस्थापनासाठी विशेष कार्यक्रम उपलब्ध असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

## सूर्यघर योजनेच्या प्रसारासाठी 'सूर्यरथ' मार्गस्थ

■ **पुणे (दै. संध्या)**


'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजने'ची माहिती घराघरांत पोहोचविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'सूर्यरथ' केंद्रीय राज्यमंत्री तथा खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रविवारी मार्गस्थ करण्यात आला. 'नॅशनल सोलर एनर्जी फेडरेशन ऑफ इंडिया' (NSEFI), पीडब्ल्यूसी (PwC) आणि एनर्जिवा व्हेंचर्स यांच्या सहकार्याने हा सूर्यरथ साकारण्यात आला आहे. पुण्यातील चिखली येथे रविवारी (दि. २६) खासदार जनसंपर्क सेवा अभियाना दरम्यान केंद्रीय राज्यमंत्री तथा खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजने'च्या सूर्यरथाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. यावेळी महावितरणचे अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर व सिंहाजीराव गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीसह विविध अधिकारी व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. पुणे जिल्ह्यात जवळपास ५० हजार घरांवर सौर प्रकल्प उभारण्यात आले असून, राज्यात पुणे जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर आहे. या योजनेला आणखी प्रोत्साहन देण्यासाठी या सूर्यरथ शहरांत फिरणार आहे. पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील विविध गृहनिर्माण सोसायट्या, मुख्य चौक आणि निवासी भागांत फिरणार आहे. या रथासोबत तज्ज्ञांचे एक पथक असेल, जे नागरिकांना सौरऊर्जा प्रणालीचे फायदे प्रत्यक्ष समजावून सांगेल. तसेच, छतावर सोलर पॅनेल बसवण्यासाठी मिळणारे शासकीय अनुदान, बँक कर्जाची सुविधा आणि ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया याबद्दल जागेवरच सविस्तर मार्गदर्शन केले जात आहे.

## महावितरण कर्मचाऱ्यांचे धाडस

> जुन्नरमध्ये भर पावसात नदी पात्रात उतरून वीजपुरवठा केला सुरळीत

■ **पुणे (दै. संध्या)**

महावितरण कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे आणि धाडसाचे एक कौतुकास्पद उदाहरण जुन्नर तालुक्यात समोर आले आहे. मुसळधार पाऊस आणि पुराचा धोका असतानाही, वीज कर्मचाऱ्यांनी स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने मीना नदीच्या पात्रात उतरून तुटलेल्या वीजवाहिन्या दुरुस्त केल्या आणि वीजपुरवठा यशस्वीपणे सुरळीत केला आहे. महावितरणच्या या कर्तव्य तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.



२३ जुलै २०२६ रोजी जुन्नर पश्चिम भागात झालेल्या मुसळधार पाऊस आणि वादळामुळे आपटाळे शाखा कार्यालयांतर्गत येणाऱ्या मौजे सोनावळे (निगळे वस्ती) येथील लघुदाब वाहिनीच्या तारा तुटून थेट मीना नदीच्या पात्रात पडल्या होत्या. नदीला पूर आल्यामुळे आणि पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान असल्याने सुरक्षेचा उपाय म्हणून तात्काळ काम करणे शक्य झाले नव्हते. त्यातच पुढील काही दिवस या भागात सलग पाऊस सुरू असल्याने दुरुस्तीच्या कामात मोठे अडथळे येत होते. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आणि वीजपुरवठा लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी आपटाळे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी रविवारी (२६ जुलै) भर पावसात मोहीम हाती घेतली. पाण्याचा प्रवाह सुरू असतानाही कर्मचाऱ्यांनी स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने अत्यंत धाडसाने नदी पात्रात प्रवेश केला. वाहत्या पाण्यातून तुटलेल्या तारा बाहेर काढून, त्या व्यवस्थित ओढून रविवारीच या परिसराचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. नैसर्गिक आपत्ती आणि आव्हानात्मक परिस्थितीतही महावितरणचे कर्मचारी अखंडित सेवा देण्यासाठी सदैव तत्पर असतात, हेच या घटनेतून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# शोभाताईंच्या कवितांमधून सकारात्मक स्त्रीजीवनाचे प्रातिनिधिक दर्शन घडते

**अतिरिक्त पोलिस आयुक्त तेजस्वी सातपुते यांचे उद्गार : शोभाताई हांगे लिखित 'मनातले मोती' कवितासंग्रहाचे प्रकाशन**

■ **पुणे (दै. संध्या)**

कवयित्री शोभाताई हांगे यांच्या कवितांमधून ग्रामीण भागातील स्त्रीजीवनाचे वास्तव तरीही सकारात्मक दर्शन घडते, असे प्रतिपादन पुणे शहराच्या अतिरिक्त पोलिस आयुक्त तेजस्वी सातपुते यांनी रविवारी येथे केले. "जसे मनात उमटले तसे कागदावर आणण्याचे धाडस आणि पराकोटीचा प्रामाणिकपणा, ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये आहेत", असेही त्या म्हणाल्या. शोभाताई शिवाजीराव हांगे लिखित 'मनातले मोती' या कवितासंग्रहाच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. नव्या पेठेतील पत्रकार भवन येथे झालेल्या या कार्यक्रमात कवयित्री शोभाताई हांगे यांच्यासह निवेदिका व कवयित्री लीनता माडगूळकर आंबेकर, समाजसेविका सारिका भरणे, पुणे जिल्हा परिषद महिला व बालकल्याण सभापती अंकिता पाटील, प्रसिद्ध वक्ते प्रा. गणेश शिंदे हे व्यासपीठावर उपस्थित होते. त्याचप्रमाणे शिवाजीराव हांगे, सत्यजीत हांगे, अजिंक्य हांगे, छाया घुले, दुर्गा वाघ, चंद्रकला सानप, शशिकला मुंढे आणि कुटुंबियांची उपस्थिती होती. तेजस्वी सातपुते पुढे म्हणाल्या, मी स्वतःदेखिल कवयित्री आईची लेक आहे आणि आईच्या कवितांचे पुस्तक प्रकाशित करण्याचा योग, मीही अनुभवला आहे. शोभाताई ग्रामीण जीवनात दीर्घकाळ राहिल्या. जुन्या काळातील परिस्थितीचा विचार करता,





त्यांनी सोसलेल्या दुःखातून जन्मलेली अशी त्यांची कविता आहे. ही कविता व्यथा, वेदना जरूर मांडते, पण ती नकारात्मक नाही. शोभाताईंमधील मातृत्व विलक्षण तेजस्वी आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेतून प्रांजळ, निखळ, सरळ अशा सोशिक मनाचे प्रतिबिंब दिसते. प्रकाशित करायच्या म्हणून या कवितांचे लेखन झालेले नाही तर जे सोसले, ते कागदावर उतरविण्याचा प्रयत्न आहे. मनोगत मांडताना शोभाताई हांगे म्हणाल्या, हे केवळ पुस्तक नाही तर माझ्या जीवनप्रवासाचा आरसा आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांना व्यक्त होण्याची संधीच मिळत नाही. त्यांच्याजवळ साधने नसतात. माझ्याजवळही नव्हती. संसार वाढला तसे वेगवेगळ्या पातळ्यांवर सोसणेही वाढले तेव्हा मी कागद – पेन जवळ केले आणि त्याच्या कविता झाल्या. माझे सोसणे, वेदना शब्दरूपात कागदावर उतरू लागले. या कविता माझ्यासाठी शक्ती ठरल्या. धीर देणाऱ्या जणु सख्या होत्या. आजही ग्रामीण भागातील अनेकींची आयुष्ये रांधा-वाढा, या चक्रात निघून जातात. मनासारखे त्यांना जगता येत नाही. तशी संधी नसते. पण मी सुदैवी ठरले. मला विश्वास ठेवणारे पती मिळाले, त्यांनी साथ दिली. कुटुंबियांनी पाठिंबा दिला आणि हा संस्मरणीय क्षण उगवला. गणेश शिंदे यांनी संवादाची, परिवर्तनाची सुरवात अंतर्मनात होते, तेव्हाच कवितेचा जन्म होतो. शोभाताईंच्या कविता अशाच अंतर्मनातून आल्या आहेत, असे प्रतिपादन केले. ग्रामीण बाजाच्या या कविता नातेसंबंध, ग्रामीण जगणं आणि सोसणं, याविषयी बोलतात. आज संपर्कसाधने अनेक, पण संवाद हरवलेला असे चित्र आहे. त्याग करणे, जबाबदाऱ्या स्वीकारणे, नात्यांचा आदर करणे आज हरवून गेले आहे. पण कुटुंब जपले, तरच माणूसपण टिकेल, हे नव्याने सांगण्याची वेळ आली आहे. शोभाताईंच्या कविता हे हरवलेपण सांगतात. वस्तू, उत्पादनांचे जागतिकीकरण झाले तसे प्रेम, वात्सल्य, करुणेचेही जागतिकीकरण व्हावे, असे वाटते. अंकिता पाटील म्हणाल्या, हांगे कुटुंब आणि पाटील कुटुंबाचे किमान चार पिढ्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. शोभाताईंचे हे पुस्तक त्यांचे अनुभव, संस्कार आणि वेदनांचे कवितेच्या माध्यमातून प्रकटलेले उद्गार आहेत. आपल्या मातीशी जोडलेले संस्कार त्यांनी पुढच्या पिढीला सोपवले आहेत. नाती जपण्याचा संदेश देणारे हे पुस्तक महत्त्वाचे आहे. लीनता माडगूळकर आंबेकर म्हणाल्या, मायलेकरांना भावुक करणारा हा विलक्षण क्षण आहे. या कवितांमधून पतीला सर्वार्थाने साथ देणारी, घर, कुटुंब, संसार समर्थपणे सांभाळणारी खंबीर गृहस्वामिनी दिसते. पुढच्या पिढीला काळाला साजेशी स्वप्ने दाखवणारी जागरूक माता दिसते, श्रद्धाळू मनाची हळवी स्त्री भेटते आणि नात्यांची वीण घट्ट बांधणारी घरंदाज ग्रामीण स्त्री नेमकेपणाने प्रकट होते.

शोभाताईंच्या या कविता म्हणजे अनुभवांच्या शिंपल्यातील अस्सल मोती आहेत. बहिणाबाईंच्या कवितेशी जातकुळी सांगणारी ही कविता वाटते.

सारिका भरणे म्हणाल्या, ग्रामीण भागातील स्त्रियांचे जीवन चूल-मूल या मर्यादेत असलेल्या काळात शोभाताई वावरल्या. त्या काळात स्त्रियांना जे सोसावे लागत होते, ते त्यांनीही सोसले. पण कवितेच्या माध्यमातून ते मांडले. त्यांच्या कविता म्हणजे ग्रामीण भागातील स्त्रीच्या मनातले आणि जीवनातलेही वास्तव आहे.

> शोभाताईंचे सुपुत्र सत्यजीत हांगे यांनी स्वागतपर प्रास्ताविक केले. आईच्या कवितासंग्रहाचे प्रकाशन हा विलक्षण योग आहे. आई स्वतः ग्रामीण भागात जन्मलेली आणि लग्न होऊन ग्रामीण भागातच आली. ६० वर्षांपूर्वी जेव्हा सलग चार मुलींचे जन्म झाले, तेव्हा तिला जे सोसावे लागले, त्याची आपण कल्पना करू शकतो. काही कवी निसर्गातून प्रेरणा घेतात, आईने वेदनेतून प्रेरणा मिळवली आहे. कवितालेखन ही कला आहे. आईचे अनुभव वैयक्तिक असले, तरी ते प्रातिनिधिक असल्याने इतरांनाही प्रेरक ठरतील, आधार देतील असे वाटल्याने हा संग्रह प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. केवळ उच्चशिक्षितांनीच लेखन करावे, असे नाही. आईप्रमाणे तळागाळातील, ग्रामीण भागातील महिलांचे जीवन व्यक्त करणारे लेखनही महत्त्वाचे आहे, ही भावनाही यामागे आहे. शीतल हांगे, चंद्रकला सानप, शशिकला मुंढे, अजिंक्य हांगे, दुर्गा वाघ यांनी स्वागत केले. सत्संग मुंढे यांनी आभार मानले. ऋतुजा फुलकर यांनी सूत्रसंचालन केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या हस्ते 'आरोग्यदूत' मासिकाचे प्रकाशन

मुंबई (दैनिक संध्या) : 'आरोग्यदूत' या मासिकाचे प्रकाशन संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते मुंबई येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख तथा उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख मंगेश चिवटे उपस्थित होते.राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्यविषयक उपक्रमांची माहिती,रुग्णांसाठी आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबिरांचा आढावा,तसेच जनसामान्यांना मिळालेल्या वैद्यकीय मदतीची माहिती 'आरोग्यदूत' मासिकामधून नियमितपणे प्रकाशित केली जाते. आरोग्य क्षेत्रातील महत्त्वपूर्ण कामांचा दस्तऐवज म्हणून हे मासिक ओळखले जात आहे. प्रकाशन समारंभात डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांनी मासिकाची पाहणी करून त्यातील माहितीपूर्ण व समाजोपयोगी आशयाचे कौतुक केले.राज्यातील नागरिकांना आरोग्यविषयक योजनांची माहिती मिळावी आणि रुग्णसेवेच्या कार्याचा व्यापक प्रसार व्हावा,यासाठी 'आरोग्यदूत' मासिक महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी नमूद केले. ओएसडी मंगेश चिवटे हे गेली अनेक वर्षे रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत असून राज्याच्या कानाकोपऱ्यात आरोग्यसेवेचे जाळे पोहोचविण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहकार्याने आरोग्यदूत मासिकातून शिंदे यांच्या संवेदनशील व जनहितैषी कार्याची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत आहे.आरोग्य क्षेत्रातील उपक्रम, रुग्णांना मिळणारी मदत आणि शासनाच्या आरोग्यविषयक योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने 'आरोग्यदूत' मासिक महत्त्वपूर्ण माध्यम ठरत असून त्याच्या प्रकाशनामुळे आरोग्यसेवेच्या जनजागृतीला अधिक बळ मिळणार असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.




### दादा भुसेंनी 7 दिवसांत राजीनामा द्यावा, अन्यथा राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील टीईटी, सीईटी आणि इतर प्रवेश प्रक्रियेतील कथित गैरव्यवहार, पेपरफुटी आणि शिक्षण विभागाच्या कारभाराविरोधात काँग्रेसच्या विद्यार्थी संघटनांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून सात दिवसांत राजीनामा द्यावा, अन्यथा काँग्रेसच्या विद्यार्थी संघटना समविचारी पक्ष व संघटनांसह राज्यभर तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश एनएसयूआयचे अध्यक्ष सागर साळुंखे यांनी दिला. मुंबईतील टिळक भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत एनएसयूआय आणि युवक काँग्रेसने 'जेन झी युनिव्हर्सिटी'च्या माध्यमातून शिक्षणमंत्री दादा भुसे यांची प्रतीकात्मक गुणपत्रिका जाहीर करत राज्यातील शिक्षण क्षेत्रातील अपयशासाठी त्यांना 'नापास' घोषित केले. सागर साळुंखे म्हणाले की, राज्यातील शिक्षण व्यवस्था मोडकळीस आली असून शिक्षण हे सेवेसाठी नव्हे तर पैसे कमावण्याचे साधन बनविण्यात आले आहे. शिक्षकांवर बीएलओसारख्या अतिरिक्त कामांचा बोजा टाकल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शिक्षण विभागातील अनागोंदीमुळे शालेय, उच्च व तंत्रशिक्षण तसेच वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत, असा आरोप त्यांनी केला. नंदुरबारमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांची कथित आर्थिक फसवणूक, बोगस नर्सिंग महाविद्यालयांचा सुळसुळाट, महाविद्यालयांमधील वाढीव शुल्क, तसेच अकरावी प्रवेश प्रक्रियेत झालेला विलंब यावरही त्यांनी सरकारवर टीका केली. "हे गैरप्रकार तातडीने थांबवले नाहीत तर रस्त्यावर उतरून सरकारला जाब विचारू," असा इशाराही त्यांनी दिला. मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन यांनीही सरकारवर टीका करत, टीईटी पेपरफुटीनंतर विविध आंदोलने करूनही सरकार जागे झाले नसल्याचा आरोप केला. शिक्षणमंत्री दादा भुसे यांचा राजीनामा होत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असे त्या म्हणाल्या.

### लॉक अपचा बोलबाला; तीन आठवड्यांत 50 दशलक्ष तास पाहिला गेला शो

पुणे (दैनिक संध्या) : नेटफ्लिक्सवरील 'लॉक अप: सच या सजा' या रिॲलिटी मालिकेने अवघ्या तीन आठवड्यांत ५० दशलक्ष व्ह्यूइंग अवर्सचा टप्पा पार केला आहे. भारतासह जगभरातील प्रेक्षकांकडून या कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत असून, इंटरनेटवर या कार्यक्रमासंदर्भात ३० लाखांहून अधिक चर्चा झाल्या आहेत. तसेच संबंधित मजकुराला तब्बल २.५ अब्ज व्ह्यूज मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. नेटफ्लिक्स आणि बालाजी टेलिफिल्म्स लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने सादर करण्यात आलेला 'लॉक अप: सच या सजा' हा भारतातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या रिॲलिटी कार्यक्रमांपैकी एक ठरत आहे. सुरुवातीला आठवड्यातील पाच दिवस कार्यक्रम प्रसारित करण्याचे नियोजन होते. मात्र, प्रेक्षकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन पहिल्याच आठवड्यात तो सहा भागांपर्यंत वाढवण्यात आला. आता अंतिम फेरीपर्यंत आठवड्याचे सातही दिवस त्याचे सलग प्रसारण करण्यात येत आहे. कार्यक्रमातील नाट्यमय घडामोडी, अनपेक्षित वळणे, स्पर्धकांचे वैयक्तिक खुलासे आणि त्यांच्यातील नातेसंबंध यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता कायम आहे. विशेषतः कार्यक्रमाचे 'जेलर्स' रितेश देशमुख आणि फराह खान यांची जोडीही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. फराह खान यांनी या कार्यक्रमाविषयी प्रतिक्रिया देताना सांगितले की, 'लॉक अप' हा त्यांनी पाहिलेल्या सर्वोत्तम कॅप्टिव्ह रिॲलिटी कार्यक्रमांपैकी एक आहे. आपण जिथे जातो तिथे लोक या कार्यक्रमाबद्दल बोलत असल्याचे त्यांनी नमूद केले. हा कार्यक्रम केवळ स्पर्धकांमधील संघर्षापुरता मर्यादित नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील बदल, भावना, नातेसंबंध आणि स्वतःचा नव्याने शोध घेण्याच्या प्रवासावरही प्रकाश टाकतो, असे त्यांनी सांगितले. अभिनेता रितेश देशमुख यांनीही प्रेक्षकांच्या प्रतिसादाबद्दल आनंद व्यक्त केला. ते म्हणाले, "५० दशलक्ष व्ह्यूइंग अवर्सचा टप्पा पार करणे हे प्रेक्षक 'लॉक अप'शी किती खोलवर जोडले गेले आहेत, याचे प्रमाण आहे. भारतीय रिॲलिटी कार्यक्रमाला केवळ देशातच नव्हे, तर जगभरातील प्रेक्षकांकडून प्रतिसाद मिळत असल्याचे पाहणे समाधानकारक आहे." या कार्यक्रमातील स्पर्धकांना विविध परिस्थितींना सामोरे जाताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील वेगवेगळे पैलू समोर येतात. दबावाच्या परिस्थितीत एखाद्या व्यक्तीची ताकद, असुरक्षितता आणि भावना कशा उलगडतात, हे या कार्यक्रमातून पाहायला मिळाल्याचे देशमुख यांनी सांगितले. स्पर्धकांनी आपल्या भीतींना सामोरे जाणे, वैयक्तिक अनुभव मोकळेपणाने मांडणे आणि अनेकदा दुर्लक्षित राहणाऱ्या विषयांवर चर्चा घडवून आणणे, ही या कार्यक्रमाची महत्त्वाची बाजू असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# 'कॉफी विथ कार्टूनिस्ट' खुला पॉडकास्ट ठरला मेजवानी

**मुंबई (दै. संध्या) :**

मराठी म्हणी आणि वाक्प्रचार नव्या पिढीपर्यंत हसत-खेळत पोहोचविण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेल्या 'चित्रमय म्हणी आणि वाक्प्रचार' या पुस्तकाच्या प्रकाशनानिमित्त सांताक्रूझ येथील ओला वाकोला बँक्वेट हॉलमध्ये 'कॉफी विथ कार्टूनिस्ट्स' हा खुला पॉडकास्ट नुकताच आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला व्यंगचित्र रसिकांनी भरपूर प्रतिसाद दिला.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले. याप्रसंगी पुस्तकाचे संपादक संजय मिस्त्री, ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर, पुस्तकाचे निर्माते संदेश चव्हाण आणि ज्येष्ठ व्यंगचित्रकार प्रशांत कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.



जुन्या मराठी म्हणी वाक्प्रचारांना व्यंगचित्रांच्या माध्यमातून जिवंत करण्याचा प्रयत्न या पुस्तकातून करण्यात आला आहे. याच संकल्पनेतून हा खुला पॉडकास्ट घेण्यात आला, अशी माहिती आयोजक आणि ओला वाकोलाचे सीईओ तसेच कार्टूनिस्ट्स कॅफे क्लबचे विद्यार्थी असलेले संदेश चव्हाण यांनी दिली.

या पॉडकास्टमध्ये गेली चार दशके व्यंगचित्र क्षेत्रात कार्यरत असलेले प्रशांत कुलकर्णी आणि संजय मिस्त्री यांनी पुस्तकातील चित्रांमागील कल्पना, त्यांचा अर्थ आणि व्यंगचित्रकलेतील विविध अनुभव रसिकांसमोर मांडले. जागतिक दर्जाच्या पॉडकास्ट सेटअपमध्ये झालेल्या या संवादामुळे भर पावसातही श्रोते तब्बल अडीच तास खिळून बसले होते.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात प्रशांत कुलकर्णी, विवेक प्रभूकेळूसकर आणि उमेश कवळे या प्रसिद्ध व्यंगचित्रकारांनी लाईव्ह व्यंगचित्र रेखाटनाचे प्रात्यक्षिक सादर केले.

यावेळी प्रशांत कुलकर्णी यांनी शरद पवार यांचे अर्कचित्र काढताना त्यांच्या आवाजाची हुबेहूब नक्कल करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाची सांगता सुप्रसिद्ध अर्कचित्रकार प्रभाकर वाईरकर यांचे लाईव्ह अर्कचित्र रेखाटून संजय मिस्त्री यांनी केली.

या कार्यक्रमाला 'महाराष्ट्र टाइम्स'चे संजीव साबडे, ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर, मराठी चित्रपट दिग्दर्शक आचरेकर, संगीतकार स्वरूप होनप, जादूगार सागर पटेल यांच्यासह अनेक डॉक्टर, अभियंते आणि व्यंगचित्रप्रेमी उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर ओला वाकोला रेस्टॉरंटतर्फे उपस्थितांना भोजनाची मेजवानी देण्यात आली. अनेक व्यंगचित्रकार एकत्र आल्याने हा कार्यक्रम छोटेखानी व्यंगचित्रकार संमेलनासारखा भासला, अशी प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

## 'लॉक अप: सच या सजा'मध्ये हिना खान आणि उर्फी जावेदची एन्ट्री

**पुणे (दै. संध्या) :**

नेटफ्लिक्सवरील 'लॉक अप: सच या सजा' या रिॲलिटी शोमध्ये आता आणखी रंगत पाहायला मिळणार आहे. अभिनेत्री हिना खान आणि उर्फी जावेद आगामी 'जजमेंट डे'मध्ये 'जनता की आवाज' म्हणून सहभागी होणार आहेत. प्रेक्षकांचा दृष्टिकोन थेट कैद्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी या दोघींवर असणार आहे. जजमेंट डेच्या कोर्टरूममध्ये हिना आणि उर्फी स्पर्धकांना कठीण प्रश्न विचारतानाच त्यांच्या खेळातील चुका आणि रणनीतीवरही बोट ठेवणार आहेत. तसेच कैद्यांच्या आतापर्यंतच्या कामगिरीबद्दल त्या आपली मते बिनधास्तपणे मांडणार असल्याने हा भाग विशेष चर्चेचा ठरण्याची शक्यता आहे. या अनुभवाबद्दल उर्फी जावेद म्हणाली, "कैद्यांशी संवाद साधताना खूप मजा आली. पुढच्या पर्वात या कार्यक्रमाचा भाग व्हायला मला नक्कीच आवडेल. श्रेया आणि शिल्पा माझ्या आवडत्या स्पर्धक आहेत. कधी कधी आकांक्षा चौधरीचाही खेळ मला आवडतो. सुफीमध्ये अजूनही खूप क्षमता आहे आणि त्याने ती दाखवायला हवी. त्याच्याकडे खेळात देण्यासारखे काही उरले नसेल, तर त्याच्या स्थानाबाबत पुन्हा विचार करण्याची वेळ आली आहे."

हिना खानसोबत सहभागी होण्याच्या अनुभवाबद्दल उर्फीने आनंद व्यक्त केला. "मी नेहमीच हिना खानची चाहती राहिले आहे. ती खरोखरच अप्रतिम आहे," असे उर्फी म्हणाली.

कार्यक्रमाचे जेलर्स रितेश देशमुख आणि फराह खान यांच्या भूमिकेचेही उर्फीने कौतुक केले. ती म्हणाली, "रितेश आणि फराह यांनी जेलर्स म्हणून अपेक्षेपेक्षा अधिक चांगली कामगिरी केली आहे.

## मुंबई प्रेस क्लब निवडणुकीत 'सेव्ह द प्रेस क्लब अलायन्स'चा दणदणीत विजय

**मुंबई (दै. संध्या) :**

मुंबई प्रेस क्लबच्या निवडणुकीत 'सेव्ह द प्रेस क्लब अलायन्स' (SPCA) ने दणदणीत विजय मिळवत सर्व सहा पदाधिकारी पदांवर तसेच व्यवस्थापन समितीच्या सर्व दहा जागांवर वर्चस्व प्रस्थापित केले.

अध्यक्षपदाच्या निवडणुकीत हिंदुस्तान टाइम्सचे सुरेंद्र पी. गांगण यांनी 582 मते मिळवत राजीव खांडेकर (260 मते) यांचा पराभव केला. एकूण 862 मते पडली असून त्यापैकी 20 मते अवैध ठरली.

अध्यक्ष (Chairperson) पदावर एस. बालकृष्णन यांनी 510 मते मिळवत मयूरेश गणपती (322 मते) यांचा पराभव केला. या निवडणुकीत 30 मते अवैध ठरली.

उपाध्यक्षपदी धोंडीबा (पांडुरंग) म्हस्के 537 मतांसह विजयी झाले. त्यांनी आशीष एस. राजे (291 मते) यांचा पराभव केला. 34 मते अवैध ठरली. सचिवपदी अनिल कुमार सिंह यांनी 513 मते मिळवत सौरभ



### सुरेंद्र पी. गांगण अध्यक्षपदी विजयी

शर्मा (315 मते) यांचा पराभव केला. संयुक्त सचिवपदी सुधाकर एस. कश्यप यांनी रुचा कानोलकर यांचा 517 विरुद्ध 324 मतांनी पराभव केला. 21 मते अवैध ठरली. कोषाध्यक्षपदी ओमप्रकाश तिवारी यांनी 487 मते मिळवत शशांक परेड (335 मते) यांचा पराभव केला. या निवडणुकीत 40 मते अवैध ठरली. व्यवस्थापन समितीवर निवडून आलेल्या सदस्यांमध्ये वैभव परब (530), स्वप्निल ए. शिंदे (502), पूनम डी. अपराज (494), मनीषा एम. रेगे (491), अनीता डी. शुक्ला (474), शाहिद ए. अन्सारी (449), आदित्य आर. दुबे (427), मधु ए. नैनन (396), के. जे. बेनीचन (387) आणि उमेश डी. गोस्वामी (380) यांचा समावेश आहे.

विजयानंतर अध्यक्ष सुरेंद्र पी. गांगण म्हणाले, "हा विजय केवळ आमचा नाही, तर बदलासाठी मतदान करणाऱ्या प्रत्येक सदस्याचा आहे. मुंबई प्रेस क्लबची प्रतिष्ठा, पारदर्शकता आणि लोकशाही मूल्ये पुन्हा प्रस्थापित करण्याचा सदस्यांनी दिलेला हा कौल आहे. आमच्यावर विश्वास दाखविल्याबद्दल सर्व मतदारांचे मनःपूर्वक आभार. निवडणुकीदरम्यान दिलेली प्रत्येक हमी पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."

## आता ठाण्यातही सुरु होणार 'महापौर वैद्यकीय मदत निधी'

**मुंबई (दै. संध्या) :**

महापौर शर्मिला पिंपोळकर आणि मंगेश चिवटे यांनी घेतली खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांची भेट; रुग्णांसाठी ठमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या धर्तीवर आता ठाणे शहरातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी 'ठाणे महापौर वैद्यकीय मदत निधी' लवकरच सुरु करण्यात येणार आहे.या उपक्रमाच्या नियोजनासाठी ठाणे शहराच्या महापौर शर्मिलाताई पिंपोळकर आणि उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांची सदिच्छा भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. ही संपूर्ण चर्चा अत्यंत सकारात्मक झाल्याचे सांगण्यात आले आहे.

याच महिन्यात मुंबई महापौर वैद्यकीय सहायता निधीचे लोकार्पण करण्यात आले होते. उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी दोन महिने सातत्याने पाठपुरावा करून मुंबईत हा कक्ष स्थापन करण्यासाठी समन्वय साधला होता. तो कक्ष पूर्ण क्षमतेने सुरु झाला असून त्याद्वारे रुग्णांना थेट वैद्यकीय मदत मिळण्यास सुरुवात झाली आहे.



त्याच धर्तीवर ठाणे शहरातील रुग्णांना आजारपणाच्या कठीण काळात मोठा दिलासा मिळावा,या उद्देशाने राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाण्यातही हा महापौर वैद्यकीय मदत कक्ष सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

खासदार डॉ.श्रीकांत शिंदे साहेब यांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले. "हा अत्यंत स्तुत्य आणि सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम आहे. यामुळे गरजू रुग्णांना वेळेत योग्य ती आर्थिक मदत मिळेल आणि रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची अडचण दूर होण्यासाठी हा कक्ष अत्यंत मोलाचा ठरेल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लवकरच या विशेष वैद्यकीय कक्षाचे औपचारिक उद्घाटन होऊन प्रत्यक्ष कामकाज सुरु होणार आहे.या निर्णयामुळे ठाणे शहरातील शेकडो गरजू रुग्णांना आणि त्यांच्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## औषध निरीक्षक भरती परीक्षेवर पेपरफुटीचा आरोप, एमपीएससीचा इन्कार

**पुणे (दै. संध्या) :**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) वतीने घेण्यात आलेल्या 'औषध निरीक्षक' (गट ब) पदाच्या भरती परीक्षेत पेपरफुटी आणि मोठा गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. सोशल मीडियावर यासंदर्भातील दावे वेगाने व्हायरल होत असून, एमपीएससी आणि अन्न व औषध प्रशासनाकडे (एफडीए) याप्रकरणी अधिकृत तक्रारही दाखल करण्यात आली आहे. मात्र, 'एमपीएससी'ने हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. तसेच, आयोगाची बदनामी करणाऱ्या आणि अफवा पसरविणाऱ्यांवर पोलिसांत रीतसर तक्रार दाखल करण्यात येईल, असा कडक इशाराही दिला आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या एका व्हिडिओमध्ये परीक्षेच्या दोन दिवस आधी, म्हणजेच २० मार्च रोजीच प्रश्नपत्रिका व्हॉट्सॲपवर उपलब्ध झाली होती, असा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय, गुणवत्ता यादीतील काही उमेदवारांचे गुण संशयास्पद असल्याचा दावा करण्यात आला आहे. कट-ऑफपेक्षा कमी गुण मिळालेल्या काही उमेदवारांनाही मुलाखतीसाठी बोलावण्यात आल्याचा आरोप संबंधित व्यक्तीने केला आहे. या कथित गैरव्यवहाराबाबत एमपीएससी आणि अन्न व औषध प्रशासनाकडे अधिकृत तक्रार दाखल करण्यात आल्याचेही व्हिडिओमध्ये सांगण्यात आले आहे. दरम्यान, अन्न व औषध प्रशासनातील सूत्रांनी या संदर्भातील तक्रार प्राप्त झाल्याची पुष्टी केली आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे विश्वासाचे 'राजकीय स्थलांतर'

### अहिल्यानगर, पुणे आणि नांदेडमधील उबाठा गटाच्या शेकडो पदाधिकारी-कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**ठाणे (दै. संध्या) :**

राज्यातील राजकीय समीकरणे वेगाने बदलत असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले असून, अहिल्यानगर, पुणे आणि नांदेड जिल्ह्यांतील उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा) गटाच्या विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत आज ठाण्यात शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश केला. या पक्षप्रवेशामुळे संबंधित भागात उबाठा गटाला मोठा धक्का बसल्याची चर्चा असून, उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वाकडे होत असलेल्या राजकीय स्थलांतराची ही आणखी एक ठळक नोंद मानली जात आहे.




### राज्यभर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावरील वाढत्या विश्वासाची चर्चा

खासदार भाऊसाहेब वाघचौरे यांच्या पुढाकाराने अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूरचे उपजिल्हाप्रमुख सचिन बडदे, राधाकिशन बोरकर, राहुल रणधीर, आशिष त्रिभुवन, नेवासाचे उपजिल्हाप्रमुख हरिराम शेळके, नीरज नागरे, पंकज लांभाटे, नितीन जगताप, राहुरीचे डॉ. अजय म्हसे, राजू गुंजाळ, विजय शिरसाट, दीपक पंडित, प्रशांत शिंदे, अकोलेचे महेंद्र धुमाळ, रामहरी तिकांडे, प्रदीप हासे, शिर्डी-राहताचे अनिल बांगरे, सोमनाथ गोरे, विजय मोहोर तसेच कोपरगावचे मुकुंद सिनकर, सचिन मलिक, अशोक पवार यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला.

पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील उबाठा गटाचे तालुकाप्रमुख नितीन शिंदे, भीमराव भोसले, सुधीर पाटील, महादेव सोमवंशी, प्रवीण देवकर तसेच जिल्हाप्रमुख सुरेंद्र जेवरे यांच्या नेतृत्वाखाली गणेश धायगुडे, विजय थिटे, विजयकुमार देवकाते, डॉ. राहुल शंख आणि असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

दौंड विधानसभा मतदारसंघातील दत्तात्रय शितोळे, संपत शिंदे, विजय गुंड, माजी जिल्हाप्रमुख ॲड. राजेंद्र काळे, विश्वास मांढरे, निलेश मदने, शहाजी दळवी, परेश भापकर यांनीही आपल्या समर्थकांसह शिवसेनेची वाट धरली.

नांदेड जिल्ह्यातील मुखेडचे जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, विजयकुमार पाटील सुगावकर, संजय रावणगावकर, गणपत पाटील मंडलापूरकर, किरण पाटील धामणगावकर या पंचायत समिती सदस्यांसह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनीही उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व नवागतांचे स्वागत करत, "शिवसेना ही सर्वसामान्यांची आणि विकासाला प्राधान्य देणारी संघटना आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून पदाधिकारी आणि कार्यकर्ते स्वेच्छेने शिवसेनेत येत आहेत. जनतेचा विश्वास आणि विकासाची भूमिका हीच आमची खरी ताकद आहे," असे सांगितले. यावेळी खासदार भाऊसाहेब वाघचौरे, आमदार विजयबापू शिवतारे, विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, माजी खासदार आनंद परांजपे, आमदार रवींद्र फाटक, बालाजी पाटील खतगावकर तसेच शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.



# पिंपरी-चिंचवड आणि परिसर



## थोडक्यात पण महत्वाचे

### अभंगवाणीच्या भक्तीरसात न्हाऊन निघाले ऐश्वर्यमचे भक्तगण

**पिंपरी : दैनिक संध्या**

ऐश्वर्यम् व्हेंचर सोसायटी येथे आषाढी एकादशी निमित्त आयोजित करण्यात आलेला "अभंगवाणी" हा भक्तिमय भक्तीगीत कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा कार्यक्रम अत्यंत भक्तिमय आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाला. विठ्ठल-रुक्मिणी पूजन, गणेश वंदना, अभंग गायन, नृत्य आणि संगीताच्या सुरेल मैफलीमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. कार्यक्रमाची सुरुवात शीतल अटलकर व संस्कार वर्गाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मंगलमय गणेश वंदनेने झाली. त्यानंतर शैलजा रामराजू, वैभवी देशपांडे, कु. आर्या पालखे आणि श्री. रोहित देव यांनी अभंग गायनाने उपस्थितांची मने जिंकली. वरदा वैशंपायन यांनी भरतनाट्यमच्या माध्यमातून सादर केलेल्या अभंगावर आधारित नृत्याविष्काराला विशेष दाद मिळाली. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरलेल्या स्वरगंधार ग्रुपने सादर केलेल्या अभंगवाणीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या सादरीकरणात मानसी नाटेकर, कु. सिद्धी देव, सोहम जोग, स्वप्निल चिल्लाळ, शुभम चिल्लाळ (ऑक्टोपॅड), विनीत नाटेकर (हार्मोनियम), निषाद नाटेकर (तबला) आणी भालचंद्र नाटेकर (निवेदन) यांनी उत्कृष्ट साथ-संगत करत कार्यक्रमाची उंची वाढवली . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश अवसेकर आणि आरती बुगदलवार यांनी केले, तर संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन धनंजय पुराणिक यांनी यशस्वीरित्या सांभाळले.उत्कृष्ट ध्वनीव्यवस्था अतुल पंढरपुरे यांनी सांभाळली . सर्व कलाकार, आयोजक, स्वयंसेवक आणि ऐश्वर्यम् व्हेंचरमधील सभासद यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा कार्यक्रम अत्यंत दर्जेदार आणि संस्मरणीय ठरला. उपस्थितांनी अशा सांस्कृतिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन भविष्यातही नियमितपणे व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. या भक्तिमय सोहळ्याने ऐश्वर्यम् व्हेंचर सोसायटी मध्ये एकात्मता, सांस्कृतिक जपणूक आणि विठ्ठलभक्तीचा सुंदर संदेश दिला.

### डॉ. पी. डी. पाटील कुलपती यांना शिक्षण महर्षी पुरस्कार प्रदान!

**पिंपरी : दैनिक संध्या**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त राष्ट्रीय श्रमिक आघाडीच्या वतीने आचार्य अत्रे रंगमंदिर पिंपरी येथे(दि.२५) आयोजित दिंडी व कामगार वारकरी मेळाव्यात डी. वाय. पाटील समूहाचे प्रमुख कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांचा "शिक्षणमहर्षी" या सन्मानाने गौरव करण्यात आला. या सोहळ्यास चिंचवडचे आमदार शंकरराव जगताप, माजी राज्यसभा खासदार अमर साबळे, विधान परिषद सदस्या उमाताई खापरे, भाजपचे शहर प्रभारी भरत नाना पाटील, प्राधिकरणचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे यांच्यासह अनेक मान्यवर, वारकरी आणि श्रमिक हजारोच्या संख्येने उपस्थित होते. यशवंतभाऊ भोसले यांनी पी. डी. पाटील यांच्या चार दशकांहून अधिक काळातील शैक्षणिक योगदानाचा गौरव करत, "हा पुरस्कार कोणत्याही शासनाचा नाही, तर समाजाचा आहे. त्यामुळे आजपासून पी. डी. पाटील हे खऱ्या अर्थाने 'शिक्षणमहर्षी' आहेत," अशी घोषणा केली. डी. वाय. पाटील संस्थेमुळे हजारो सर्वसामान्य, कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थी डॉक्टर, अभियंते, आयटी तज्ज्ञ होऊन देश-विदेशात यशस्वी झाले असल्याचे त्यांनी नमूद केले.भोसले यांनी सोशल मीडियातील पत्रकारांसाठी डी. वाय. पाटील संस्थेत प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याची तसेच पत्रकारांसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची विनंतीही यावेळी केली. सत्काराला उत्तर देताना डॉ. पी. डी. पाटील यांनी हा सन्मान आपल्यासाठी अत्यंत भावनिक असल्याचे सांगितले. "मी गेली ४५ वर्षे पिंपरी-चिंचवडमध्ये शिक्षण क्षेत्रात काम करत आहे. पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या मार्गदर्शनातून या संस्थेचा विस्तार करण्याची संधी मिळाली. आज जागतिक स्तरावर मान्यता मिळालेल्या संस्थेचा भाग असल्याचा अभिमान वाटतो. हा सन्मान माझ्यासाठी प्रेरणादायी असून याचे श्रेय माझ्या सहकाऱ्यांना आणि समाजाला आहे. शिक्षण महर्षी पुरस्कार दिल्याबद्दल कामगार नेते यशवंतभाऊ भोसले तसेच राष्ट्रीय श्रमिक आघाडीचा आभारी आहे, असे ते म्हणाले. आमदार शंकरराव जगताप यांनी पी. डी. पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, "पिंपरी-चिंचवडची ओळख जगभर पोहोचविण्यात डी. वाय. पाटील संस्थेचे मोलाचे योगदान आहे. सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत त्यांनी अनेकांचे जीवन घडविले आहे. माझ्या कुटुंबातील सदस्यालाही त्यांच्या माध्यमातून शिक्षणाची संधी मिळाली आणि आज तो यशस्वी उद्योजग आहे."राष्ट्रीय श्रमिक आघाडीने सुरू केलेल्या दिंडी उपक्रमाचे कौतुक करत, "श्रमिक आणि वारकरी यांचा सुंदर संगम घडवून आणण्याचे कार्य यशवंतभाऊ भोसले करत आहेत. हा उपक्रम पुढील अनेक वर्षे सुरू राहावा," अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. माजी राज्यसभा खासदार अमर साबळे यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे" या विचाराचा उल्लेख करत, "पी. डी. पाटील यांनी शिक्षणाची पंढरी उभी करून हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य घडविले आहे. त्यांनी अनेक पिढ्या घडवल्या असून हीच खरी राष्ट्रसेवा आहे. यशवंतभाऊ भोसले यांनी"श्रमिकांच्या सेवेसाठी आयुष्य वाहिले आहे. निष्काम कर्मयोगाच्या भावनेतून ते सातत्याने समाजकार्य करत असून अशा व्यक्तींच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडत आहे."

### आकुर्डीत रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद, ३२७ दात्यांचे रक्तदान

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी:- दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंती निमित्त आकुर्डी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 327 दात्यांनी रक्तदान केले. आकुर्डीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक प्रमोद कुटे, नगरसेविका वैशाली काळभोर, नगरसेविका अरुणा लंगोटे आणि सामाजिक कार्यकर्ते विशाल काळभोर यांच्या वतीने अजित पवार यांच्या जयंती निमित्त जनसेवा सप्ताह आयोजित केला होता. बुधवारपासून अन्नदान, महा आरोग्य शिबिर, वृक्षारोपण असे विविध कार्यक्रम घेण्यात आले. रविवारी आकुर्डीतील विठ्ठल मंदिर येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. 327 पिशव्या रक्त संकलित झाले. नगरसेवक प्रमोद कुटे म्हणाले, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहराचा कायापालट केला आहे. त्यांच्यामुळे शहराची ओळख जगाच्या नकाशावर पोहोचली आहे. अजितदादांच्या अकाली जाण्याने शहराची मोठी हानी झाली आहे. त्यांचा वाढदिवस साजरा करण्याऐवजी जयंती साजरी करावी लागत आहे.

### डॉ.संजीवनी पांडे यांची भाजपा प्रदेश महिला मोर्चा सचिवपदी नियुक्ती

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी : भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चाच्या सचिवपदी डॉ. संजीवनी पांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. डॉ. पांडे यांनी पक्ष संघटना बळकट करण्यासाठी तसेच महिला सक्षमीकरणाच्या विविध उपक्रमांमध्ये सातत्याने सक्रिय भूमिका बजावली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा सचिवपदाची जबाबदारी सोपवली आहे. या नियुक्तीबद्दल विधान परिषद आमदार उमा खापरे यांनी डॉ. संजीवनी पांडे यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली महिला मोर्चाचे संघटन अधिक मजबूत होईल आणि पक्षाची विचारधारा राज्यातील अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.



# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महिला कृषी सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र (देवाभाऊ) फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वतीने शहरात 'महिला कृषी सन्मान सोहळा' अत्यंत उत्साहात आणि दिमाखात आयोजित करण्यात आला. या विशेष कार्यक्रमात २०० हून अधिक शेतकरी महिलांची ओटी भरून व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. उपस्थित महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवाभाऊ यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या, तर "देवाभाऊ, धन्यवाद!" अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि मान्यवरांच्या हस्ते झाली. याप्रसंगी विधान परिषदेच्या आमदार मा. उमाताई खापरे यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना मनोगत व्यक्त केले. महिलांनी आजवर समाज, कुटुंब आणि शेती क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महिलांसाठी राबविण्यात आलेल्या विविध कल्याणकारी योजनांमुळे त्यांना अधिक बळ, आत्मविश्वास आणि सामाजिक स्थैर्य प्राप्त झाले आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयांमुळे महिला भविष्यात अधिक सक्षमपणे समाजकार्यात आणि विकासाच्या प्रवाहात आपले योगदान देतील, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पिंपरी-चिंचवड भाजप शहराध्यक्ष श्री. शत्रुघ्न (बापू) काटे यांनी आपल्या मनोगतात महिलांच्या योगदानाचे विशेष कौतुक केले. महिला आज समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात अत्यंत सक्षमपणे कार्यरत असून, त्यांच्या सक्षमीकरणाला खरी गती मुख्यमंत्री देवाभाऊ यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या काळात मिळाली आहे, असे त्यांनी सांगितले. महिलांसाठी विविध लोककल्याणकारी योजना राबविण्यात आल्या, त्यांना 'लाडकी बहीण' म्हणून सन्मानाची ओळख मिळाली आणि आता शेतकरी महिलांनाही स्वतंत्र शेतकरी म्हणून हक्काचे व सन्मानाचे स्थान मिळाले आहे. या ऐतिहासिक निर्णयांबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात भाजपा महिला मोर्चा शहराध्यक्ष सौ. सुजाता



सुनील पालांडे यांनी शासनाच्या विविध महिला कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती दिली. महिला या कोणाच्याही स्पर्धेत नसून समाज आणि कुटुंबाच्या विकासात समान जबाबदारीने सहभागी आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महिलांच्या सन्मानासाठी आणि शेतकरी महिलांच्या हक्कांसाठी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे महिला वर्गात अभूतपूर्व आत्मविश्वास निर्माण झाला आहे, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी उपस्थित शेतकरी महिलांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, आतापर्यंत शेती क्षेत्रात अहोरात्र कष्ट करूनही त्यांच्या कष्टाची स्वतंत्र शेतकरी म्हणून पुरेशी दखल घेतली जात नव्हती. मात्र, शासनाने घेतलेल्या या ऐतिहासिक व सन्माननीय निर्णयामुळे आता त्या अभिमानाने स्वतःची ओळख "शेतकरी महिला" म्हणून मांडत आहेत.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते दादासाहेब क्षिरसागर यांनी शेती, महिला सक्षमीकरण आणि शासनाच्या विविध कृषीविषयक योजनांबाबत उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. तसेच राजेश वसावे यांनीही महिलांना अनेक महत्त्वपूर्ण शासकीय योजनांची माहिती दिली.

या भव्य कार्यक्रमास संघटन मंत्री श्री. मोरेश्वर शेडगे, श्री. मधुकर बच्चे, महिला मोर्चाच्या प्रभारी सौ. हर्षदा फरांदे, मा. उपमहापौर शर्मिला बाबर, मा. उपमहापौर शैलजा मोरे, नगरसेविका योगिता नागरगोजे, अर्चना तापकीर, स्नेहा कलाटे, आरती चौंधे, रेखा देवकर, राणी पठारे, अनिता काटे, राजश्री लांडगे, शालिनी गुजर, मनीषा चिंचवडे, महिला मोर्चाच्या सरचिटणीस सौ. अनघा रुद्र, रोहिणी मांढरे, गायत्री तळेकर, पल्लवी पाठक, स्वाती जाधव, किरण पाचपांडे, जयश्री मखवाना, मनीषा कुलकर्णी, प्रतिमा जवळकर, स्वाती देशमुख तसेच महिला मोर्चाच्या सर्व पदाधिकारी, आदरणीय महिला लोकप्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने शेतकरी महिला उपस्थित होत्या. विशेष सहकार्य अनुपदादा मोरे यांचे लाभले.

कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन महिला मोर्चाच्या उपाध्यक्षा सौ. ऐश्वर्या बाबर यांनी केले, तर महिला मोर्चाच्या सरचिटणीस सौ. अनघा रुद्र यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची उत्साहात व मंगलमय वातावरणात सांगता झाली.

## पवना धरण १०० टक्के, नदी दुथडी भरून वाहत असताना पाणी कपात कशासाठी?

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवडकरांची तहान भागविणारे मावळातील पवना धरण १०० टक्के भरले असून पाण्याचा विसर्ग केला जात आहे. नदी दुथडी भरून वाहत असताना १५ टक्के पाणी कपात कायम कशासाठी ठेवली आहे?, असा सवाल शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केला आहे. ही पाणी कपात तत्काळ रद्द करण्याची सूचना खासदार बारणे यांनी महापालिका प्रशासनाला केली आहे.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचा भोंगळ कारभार सुरू आहे. पवना धरण १०० टक्के भरले असतानाही नागरिकांना वेठीस धरले जात आहे. १५ टक्के पाणी कपात कायम ठेऊन नागरिकांना टँकरने पाणीपुरवठा घेण्यास भाग पाडले जात आहे. यातून टँकर लॉबीला पोसण्याचे काम महापालिका प्रशासन करीत आहे. शहरात अतिशय कमी दाबाने, अपुरा पाणीपुरवठा होत आहे. अनेक सोसायट्याना आजही टँकरने पाणी घ्यावे लागत आहे. सोसायटी धारकांचा टँकरवर लाखो रुपयांचा खर्च होत असून आर्थिक भार सहन करावा लागत आहे. अनेक वर्षांपासून ३० ते ३५ टक्के पाणी गळती होत आहे. स्मार्ट मीटर बसविले, स्काडा प्रणाली आणली. अमृत योजनेअंतर्गत पाइपलाइन बदली. शहरातील अनेक भागात नवीन पाइपलाइन टाकली. त्यानंतरही पाणी गळती, टँकर लॉबी रोखण्यात महापालिका प्रशासन अपयशी ठरले आहे.

पवना धरणात १०० टक्के पाणीसाठा झाला आहे. पवना नदी दुथडी भरून वाहत आहे. रावेत बंधाऱ्यातून पूर्ण क्षमतेने पाणी उचलले जात आहे. असे असतानाही महापालिका प्रशासनाने स्वतःच्या चुका झाकण्यासाठी १५ टक्के पाणी कपात कायम ठेवली आहे. ही कपात नेमकी कशासाठी कायम ठेवली आहे, याचा शोध लावावा लागेल. धरणात, नदीत पाणी आहे. त्यामुळे महापालिका आयुक्तांनी तातडीने १५ टक्के पाणी कपात रद्द करावी. नागरिकांना मुबलक पाणी द्यावे, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली.

## क्लासशिवाय रोज अभ्यास, हेच माझ्या यशाचे रहस्य

■ पिंपरी (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आणि कै. गणपत गोरखे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'अमित गोरखे यूथ फाउंडेशन' च्या वतीने आयोजित 'गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा २०२६' अत्यंत दिमाखात पार पडला. बुधवार, दिनांक २२ जून रोजी नोवेल स्कूल येथे संपन्न झालेल्या या सोहळ्यात दहावी आणि बारावीच्या परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला पाठबळ देणाऱ्या या उपक्रमाचे हे सलग सातवे वर्ष होते. गुणवंत विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाला मदत म्हणून यावेळी 'कै. गणपत गोरखे शिष्यवृत्ती'चे वितरण देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना देखील जयंती निमित्त अभिवादन यावेळी करण्यात आले.

मागासवर्गीय समाजातून पुढे येत, कठीण परिस्थितीवर मात करत यूपीएससी परीक्षेत देशात १२५ वा क्रमांक पटकावणाऱ्या कबीर कांबळे यांनी आपल्या प्रेरणादायी प्रवासाबद्दल सांगितले की, यूपीएससीसारख्या कठीण परीक्षेत केवळ १ टक्क्यांपेक्षा कमी उमेदवारांची निवड होते. ग्रॅज्युएशननंतर मी स्वतः सिव्हिल सर्व्हिस परीक्षांमध्ये सलग अपयशी झालो होतो. मात्र, मी नापास झालो तरीही माझ्या आई-वडील आणि भावाने मला मिठाई भरवून माझा उत्साह वाढवला.

## रक्तदान हेच श्रेष्ठ दान... सेवेतून साजरा झालेला अविस्मरणीय उपक्रम!

■ पिंपरी (दै. संध्या)

मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य रक्तदान शिबिरास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान करून समाजसेवेचा प्रेरणादायी संदेश दिला. या समाजहिताच्या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व रक्तदाते, स्वयंसेवक आणि उपस्थित मान्यवरांचे मनःपूर्वक आभार.

या प्रसंगी विधानपरिषद आमदार मा. अमितसाहेब गोरखे, मा. नगरसेविका गीताताई आफळे, नगरसेवक अमितजी गावडे, उमेशजी कुलकर्णी, अमोलजी भोईटे, उद्योजक निकेश ताकवणे, विनायक आवसरे तसेच उद्योजक अविनाश काचोळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच सागर दिघे, भूषण बाबर, रोहन बाबर, प्रमोद पांडे, अविनाश भालेकर, दीपक गावंदरे, सुशांत भिसे, सागर सोनावले, संदेश कुरकुटे, सचिन कुलकर्णी, महेश मोरे, योगेश भामरे आदी मान्यवरांनी उपस्थित राहून रक्तदाते आणि स्वयंसेवकांचा उत्साह द्विगुणित केला.या उपक्रमाचे संयोजक श्री. राजेंद्रजी बाबर तसेच उपमहापौर सौ. शर्मिलाताई राजेंद्र बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. अभय प्रभुणे, श्री. राजेश कडू आणि श्री. राहुल तानवडे यांनी घेतलेल्या अथक परिश्रमाबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन व मनःपूर्वक आभार. रक्तदान म्हणजे जीवनदान... एका रक्तदात्यामुळे अनेकांना नवजीवन मिळते. चला, समाजसेवेचा हा संकल्प अधिक दृढ करत मानवतेची ही साखळी अखंड ठेवूया!



# १६० ग्रामदूतांच्या सहभागातून ६ टन कचऱ्याची विल्हेवाट

**‘विठ्ठल बन’ येथे सलग नवव्या वर्षी विशेष स्वच्छता सेवा अभियान**



**उरुळी कांचन (दै. संध्या)**

प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र विठ्ठल बन, डाळींब येथे आषाढी यात्रा व बारस महाप्रसादानिमित्त येणाऱ्या लाखो भाविकांच्या पार्श्वभूमीवर ड्रीम्स युवा सोशल फाउंडेशन संचलित उरुळी कांचन ग्रामस्वच्छता अभियान ग्रुपच्या नेतृत्वाखाली सलग नवव्या वर्षी विशेष स्वच्छता सेवा अभियान उत्साहात पार पडले. या अभियानात १६० ग्रामदूतांनी सहभागी होत अवघ्या अडीच तासांत सुमारे ६ टन कचरा संकलित करून त्याची योग्य विल्हेवाट लावली.

सोमवारी (दि.२७ जुलै) सकाळी ६ ते ८.३० या वेळेत राबविण्यात आलेल्या या अभियानात स्वयंसेवकांनी भक्तिभावाने स्वच्छता सेवा बजावत विठ्ठल बन परिसर चकाचक केला. यात्रेनिमित्त मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला कचरा तातडीने हटविल्यामुळे भाविकांना स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध झाले.

या उपक्रमात ड्रीम्स युवा सोशल फाउंडेशन संचलित उरुळी कांचन ग्रामस्वच्छता अभियान ग्रुप, आदर पुनावाला क्लीन सिटी इनिशिएटिव्ह ग्रुप, डाळींब ग्रामस्वच्छता अभियान ग्रुप, उरुळी कांचन ग्रामपंचायत, श्री विठ्ठल देवस्थान ट्रस्ट, डाळींब ग्रामपंचायत तसेच डाळींब गाव व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घेतला. माजी नगरसेवक धीरज घाटे यांनी कचरा संकलनासाठी आवश्यक वाहनांची उपलब्धता करून देत अभियानास मोलाचे सहकार्य केले.

सर्व संस्था, स्वयंसेवक आणि ग्रामस्थांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे केवळ स्वच्छताच नव्हे, तर पर्यावरण संवर्धन, सामाजिक जबाबदारी आणि लोकसहभागाचा प्रभावी संदेश समाजापर्यंत पोहोचला. सलग नऊ वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येत असलेले हे अभियान परिसरातील लोकसहभागाचे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

"आजची ही स्वच्छता सेवा श्री विठ्ठल चरणी अर्पण" या भावनेतून पार पडलेल्या या उपक्रमाने सेवाभाव, श्रद्धा आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम घडवून आणला. स्वच्छतेची जनजागृती आणि लोकसहभागातून परिवर्तन घडविणाऱ्या या अभियानाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

---



## जेजुरीतील जिजामाता विद्यालयाचे इयत्ता ७ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत ११ विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र

**जेजुरी (दै. संध्या)**

■ कु. ईश्वरी कैलास हिंगणे २४८ गुण मिळवून तालुक्यात प्रथम

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित उच्च प्राथमिक (इयत्ता ७ वी) शिष्यवृत्ती परीक्षा दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेचा अंतरिम निकाल नुकताच जाहीर झाला असून, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी या विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन करत ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांमध्ये ईश्वरी कैलास हिंगणे हिने २४८ गुण मिळवून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. शंतनु रणनवरे याने २०८ गुण, तर आर्या गरुड हिने १९६ गुण मिळवून उल्लेखनीय यश मिळवले. तसेच आर्या ताकवले, अनुष्का काकडे, गौरवी कुदळे, माही देशमुख, पायल दोरगे, शालिनी सुपेकर, गौरव सावंत आणि दुर्वा घोरपडे हे विद्यार्थीही शिष्यवृत्तीस पात्र ठरले.

या यशामागे विद्यालयाचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांचे मार्गदर्शन, पर्यवेक्षक बी. के. जगताप, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गायत्री बेलसरे,माध्यमिक विभागप्रमुख प्रल्हाद गिरमे,ज्युनिअर विभाग प्रमुख किरण मोडक यांचे सहकार्य तसेच शिष्यवृत्ती परीक्षा विभागप्रमुख पांडुरंग आटोळे (गणित व बुद्धिमत्ता), कुलदीप साळवे (इंग्रजी), गणेश भंडलकर (मराठी) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

विद्यालयाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, पश्चिम महाराष्ट्र भाजपचे सरचिटणीस व संस्थेचे सचिव मा. आमदार संजयजी चंदुकाका जगताप, भारतीय प्रशासन सेवा अधिकारी व संस्थेचे विशेष सल्लागार डॉ. राजेंद्रबापू जगताप, संस्थापक सचिव डॉ. एम. एस. जाधव, सहसचिव दत्तात्रय गवळी, समन्वयिका सोनालीताई शिंदे, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा व विश्वस्त सौ. राजवर्धनीताई जगताप, भारती विद्यापीठाच्या संचालिका व विश्वस्त डॉ. अस्मिताताई जगताप, तसेच व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे आणि रवींद्रपंत जगताप यांनी यशस्वी विद्यार्थी, त्यांचे पालक व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी सोमनाथ उबाळे, डॉ.मधुसूदन जगताप,राजेंद्र ताम्हाणे,मयुर शिंदे,संपतराव कड,गणेश खळदकर,सोनबा दुर्गाडे,राजाराम पिसाळ,अजय जगताप,योगेश घोरपडे,सागर चव्हाण,राघू हारुळे,निर्मला निगडे, कैलास सोनवणे,महेश खाडे उपस्थित होते.

---

## दोन दिवसांत निर्णय न झाल्यास रास्ता रोकोचा इशारा

**शिरूर (दै. संध्या)**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे शिरूर शहरात उचित स्मारक व्हावे तसेच शहरातील लाटेआळी व इंदिरानगर परिसरात अण्णाभाऊंच्या नावाने स्वागत कमान उभारावी, या मागणीसाठी लहूजी शक्ती सेनेचे राज्य सहसचिव दादाभाऊ लोखंडे व शहर उपाध्यक्ष विनोद उर्फ पप्पू साठे यांनी आजपासून नगर परिषदेच्या मंगल कार्यालयासमोर उपोषण आंदोलन सुरू केले. शहर व परिसरातील विविध संस्था संघटनांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला आहे. आपल्या शाहिरीने, साहित्याने आणि समाजकार्याने महाराष्ट्राची भूमी समृद्ध करण्यात मोठा हातभार लावलेल्या अण्णाभाऊ साठे यांचे शहरात स्मारक व्हावे, यासाठी नगर परिषद प्रशासनाकडे गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा चालू असल्याचे दादाभाऊ लोखंडे यांनी सांगितले. ऑगस्ट २०२४ मध्ये देखील याच मागणीसाठी आठ दिवसांचे उपोषण केले. त्यावेळी नगर परिषद प्रशासनाने अण्णाभाऊंचे स्मारक उभारण्याबाबत आश्वस्त केल्याने उपोषण मागे घेतले होते. मात्र, त्यानंतर प्रशासकीय दप्तर दिरंगाईत स्मारक उभारण्याचा विषय गुंडाळला गेल्याने पुन्हा उपोषणाचे अस्त्र उगारावे लागले असल्याचे ते म्हणाले.

---

## यश मिळवण्यासाठी मोबाईलला दूर ठेवा

■ नीट परीक्षेत मुलींमध्ये देशात पहिली आलेले श्रावणी कुदळेचा विद्यार्थ्यांना सल्ला

■ भिगवण येथे मराठा महासंघाच्या वतीने गुणवंतांचा सत्कार

**भिगवण (दै. संध्या)**



नुकत्याच पार पडलेल्या नीट परीक्षेत नेत्र दीपक यश मिळवलेल्या भिगवण परिसरातील विद्यार्थ्यांचा सन्मान अखिल भारतीय मराठा महासंघाच्या भिगवण शाखेच्या वतीने रविवार ( ता.२६) रोजी छत्रपती शिवराय वाचनालयात संपन्न झाला. यामध्ये देशात ओबीसी महिलांमधून पहिली ,व महाराष्ट्रात प्रथम आलेली ,श्रावणी कृष्णा कुदळे (खडकी) 720 पैकी 715 गुण , प्रणव पुरणलाल टेंभुर्णे ( भिगवण) 720 पैकी 700 गुण, अनुश्री अजय थोरात ( भिगवण) 720 पैकी 692 गुण , अपूर्व वैभव दोबाडा ( जिंती) 720 पैकी 594 गुण, प्रेरणा प्रदीप सोनने ( डाळज) 720 पैकी 576 गुण, समर्थ नितीन खानावरे ( भिगवण) 720 पैकी 547 गुण, समृद्धी सतीश हगारे (डाळज) 720 पैकी 535 गुण, या विद्यार्थ्यांचा सत्कार प्रकाश बापू ढवळे, पद्माकर माडगे, राजकुमार मस्कर सर अॅड.पांडुरंग जगताप, डॉ. माधवराव नाईक निंबाळकर, अशोकराव साळुंखे, डॉ. जयप्रकाश खरड, अजित रणदिवे,सचिन जांभले,विजयकुमार गायकवाड,भरत मोरे,अनिल गलांडे, विकास वाघ, श्रीकांत माने, दत्ता जाधव,शरद जगदाळे, डॉ. पद्मा खरड, या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना श्रावणी कुदळे हिने सांगितले की, मी सलग तीन वर्ष मोबाईल दूर ठेवून अभ्यास केल्याने मला हे यश संपादन करता आले. त्याचबरोबर इतरही गुणवंत विद्यार्थ्यांनी आपण मोबाईल दूर ठेवून अभ्यास केल्याचे सांगितले. कार्यक्रमास डॉ. अजय थोरात.डॉ. प्राची थोरात, डॉ. नितीन खानावरे धनाजी नलवडे,दादा रणसिंग, यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक महासंघाचे शाखाध्यक्ष डॉ.संकेत मोरे यांनी केले तर आभार सुचिता साळुंखे यांनी मानले.

---

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आ. रोहित पवारांच्या पुढाकाराने एक लाख छत्र्यांचे वाटप - डॉ. योगेश रणदिवे

पंढरपूर (दैनिक संध्या) : आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांच्या माध्यमातून दर्शनासाठी आलेल्या वारकऱ्यांसह यात्रेच्या बंदोबस्तासाठी दिवस-रात्र कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी, छोटे व्यावसायिक, दिव्यांग नागरिक, आरोग्य सेवक आणि परिचारिका यांना उन्हाचा तडाखा व पावसाच्या सरींपासून संरक्षण मिळावे, या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर छत्र्यांचे वाटप करण्यात आले अशी माहिती डॉक्टर योगेश रणदिवे यांनी दिली. आषाढी वारीत लाखो भाविकांच्या सेवेसाठी अनेक यंत्रणा अहोरात्र कार्यरत असतात. ऊन वारा पाऊस यापासून संरक्षण करण्या करता एक लाख छत्र्यांचे वाटप करण्यात आले समाजामध्ये अशा प्रत्येक घटकाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांना प्रत्यक्ष उपयोगी पडेल अशी मदत करण्याच्या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे नियोजन डॉ. योगेश रणदिवे व शहराध्यक्ष दीपकदादा वाडदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शिक्षक सेलचे जिल्हाध्यक्ष अमरसिंह खांडेकर सर, आसिफ पटेल, दिनेश ममाने तसेच स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पंढरपूर शहरातील विविध ठिकाणी जाऊन लाभार्थ्यांना छत्र्यांचे वाटप केले.



### आजी-माजी सैनिक संघटनांच्या वतीने "कारगिल विजय दिवस" साजरा

सोमेश्वरनगर (दैनिक संध्या) : १९९९ साली झालेल्या युद्धात प्राण अर्पण करणाऱ्या भारतीय सैनिकांच्या शौर्य आणि बलिदानाचा सन्मान दिन असतो.या कारगिल विजयी दिवसाचे उद्दिष्ट तरुणांमध्ये देशभक्ती,अभिमान आणि कृतज्ञेची भावना निर्माण करणे आणि राष्ट्रीय एकता आणि त्यागाची भावना बळकट करणे म्हणून देशभर कारगिल विजय दिवस हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असतो. २६ जुलै रोजी आजी-माजी सैनिक संघटना बारामती तालुका,मुख्य शाखा सोमेश्वरनगर ऑफिस कार्यालय येथे दर वर्षी कारगिल विजय दिवस साजरा करण्यात येत असतो.या अनुषंगाने रविवारी दिनांक २६ जुलै 2026 रोजी कारगील विजयोत्सव सैनिक संघटना कार्यालयात साजरा करण्यात आला.कारगील मधील शहीदांना श्रद्धांजली वाहून भारत माता की जय... पाकिस्तान मुर्दाबाद.... च्या घोषणा यावेळी देण्यात आल्या. यावेळी अध्यक्ष ताराचंद शेंडकर, अॅड.गणेश आळंदीकर,उपाध्यक्ष भगवान माळशिकारे,कार्याध्यक्ष बाळासाहेब गायकवाड,जेष्ठ राजाभाऊ थोपटे,मीनानाथ होळकर,विक्रम लकडे व गणेश शेंडकर इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

---

## ट्रक-दुचाकीच्या अपघातात एक ठार, एक गंभीर जखमी

### दुचाकीवर सख्खे दोन भाऊ; सुपेतील अहिल्याबाई चौकातील दुर्घटना

**सुपे (दै. संध्या)**



बारामती तालुक्यातील सुपे-चौफुला मार्गावरील अहिल्याबाई चौकात मालवाहू ट्रक आणि दुचाकीचा भीषण अपघात होऊन दुचाकीवरील एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचा सख्खा भाऊ गंभीर जखमी झाला. ही घटना रविवारी (दि. २६) दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास घडली.

या अपघातात सोमनाथ दत्तात्रय ठोंबरे (रा. शेंडगेवाडा, सुपे, ता. बारामती) यांचा जागीच मृत्यू झाला. तर शुभम दत्तात्रय ठोंबरे (रा. शेंडगेवाडा, सुपे, ता. बारामती) हे गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर विश्वराज हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मोरगाव येथील शाळेतून दोन्ही सख्खे भाऊ दुचाकी (क्र. एमएच ४२ ई १८७८) वरून घराकडे जात होते. अहिल्याबाई चौकातून पुढे वळण घेत असताना त्यांची दुचाकी घसरली. त्याच वेळी मोरगावच्या दिशेने जात असलेल्या मालवाहू ट्रक (क्र. एमएच १० सीआर ४१९९) च्या चाकाखाली दुचाकी गेल्याने हा भीषण अपघात झाला. अपघातात सोमनाथ ठोंबरे यांचा जागीच मृत्यू झाला, तर शुभम ठोंबरे गंभीर जखमी झाला आहे. त्याला पुढील उपचारासाठी लोणी काळभोर येथील विश्वराज हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच सुपे पोलीस घटनास्थळी दाखल होवुन झालेली वाहतूक कोंडी सुरळीत केली. अपघाताचा पुढील तपास सुपे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोजकुमार नवसरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

---

## ‘पुण्यशोक अहिल्याबाई होळकर कर्जमुक्ती योजना २०२६’ला वेग

**जुन्नर (दै. संध्या)**

जुन्नर तालुक्यात महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पुण्यशोक अहिल्याबाई होळकर कर्जमुक्ती योजना 2026' च्या प्रभावी अमलबजावणीसाठी वेगाने कार्यवाही सुरू झाली आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यामध्ये तालुक्यातील 121 गावांमधील एकूण 3,266 पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची यादी शासनाकडून प्रसिद्ध करण्यात आली. शनिवार ता. 25 रोजी तालुक्यातील जिल्हा बँकेच्या सर्व शाखा, विकास सोसायट्यांचे कार्यालये याठिकाणी या याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या. या पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या याद्या संबंधित बँकांमध्ये आणि विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थां, ग्रामपंचायत व तलाठी कार्यालयामध्ये प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. यादीतील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या नजिकच्या महा ई-सेवा केंद्रात किंवा आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन मुदतीपूर्वी आपले आधार प्रमाणीकरण करावे तसेच जास्तीत जास्त पात्र शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन सहाय्यक निबंधक डॉ. गजेंद्र देशमुख यांनी केले आहे.

---

**नीरा-शिवतक्रार येथे कृषीकन्यांकडून जनजागृती**

## माती परीक्षण म्हणजे शेतीच्या आरोग्याचा आरसा




**नीरा (दै. संध्या)**

ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कृषी महाविद्यालय, बारामतीच्या कृषीकन्यांनी नीरा-शिवतक्रार येथे शेतकऱ्यांसाठी माती परीक्षण प्रात्यक्षिक व जनजागृती कार्यक्रम आयोजित केला. "माती परीक्षण म्हणजे शेतीच्या आरोग्याचा आरसा" हा संदेश देत शेतकऱ्यांना शास्त्रशुद्ध शेतीसाठी माती परीक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. यावेळी कृषीकन्यांनी शेतकऱ्यांना पिके काढल्यानंतर किंवा पेरणीपूर्वी तसेच रासायनिक खते देण्यापूर्वी अथवा खते दिल्यानंतर तीन महिन्यांनी मातीचा नमुना घेण्याचा सल्ला दिला. माती परीक्षणाच्या अहवालानुसार खत व्यवस्थापन केल्यास खतांचा अपव्यय टाळून उत्पादनात वाढ करता येते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात शेतातून मातीचे नमुने शास्त्रशुद्ध पद्धतीने कसे गोळा करावेत, याचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. तसेच माती परीक्षणामुळे जमिनीतील पोषक घटकांची उपलब्धता, कमतरता, मातीचा सामू (pH), मातीचा प्रकार आणि सुपीकतेची माहिती मिळते. त्यानुसार योग्य पिकांची निवड, संतुलित खतांचा वापर आणि उत्पादनवाढ साध्य करता येते, अशी माहिती देण्यात आली.

"माणसाप्रमाणे मातीही आजारी पडते आणि तिच्याही आरोग्याची तपासणी आवश्यक असते," या समर्पक उदाहरणातून शेतकऱ्यांना माती परीक्षणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. कार्यक्रमाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. निलेश नलावडे, उपप्राचार्य एस. पी. गायकवाड तसेच प्रा. समीर बुरुंगले, प्रा. पल्लवी पाटील आणि प्रा. आरती भोईटे यांचे मार्गदर्शन लाभले.

---

## नीरेच्या बाजारपेठेत पुन्हा दुमदुमला बैलांच्या घुंगरांचा नाद; पारंपरिक देशी बेंदुर उत्साहात साजरा

**सजलेल्या सर्जा-राजांची सवाद्य मिरवणूक; घरोघरी बैलपूजन आणि पुरणपोळीचा नैवेद्य**

**नीरा (दै. संध्या)**



एकेकाळी शेतकऱ्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या बैलांच्या गळ्यातील घुंगरांचा मंजुळ नाद सोमवारी (दि. २७) देशी बेंदुराच्या निमित्ताने पुन्हा एकदा नीरेच्या बाजारपेठेत घुमला. आधुनिक युगात बैलगाड्या आणि बैलजोड्या दुर्मिळ होत असताना, नीरा व परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या सर्जा-राजांची आकर्षक सजावट करून काढलेल्या सवाद्य मिरवणुकीने बाजारपेठेत पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडविले.

शेतकऱ्यांची बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या नीरा गावात पूर्वी शेतमाल बैलगाड्यांतून विक्रीसाठी आणला जात होता. त्यामुळे बाजारपेठ बैलांच्या घुंगरांच्या आवाजाने नेहमीच गजबजलेली असायची. मात्र, आधुनिक वाहनांच्या वापरामुळे बैलांचे दर्शन आणि त्यांच्या गळ्यातील घुंगराचा नाद हळूहळू दुर्मिळ झाला. देशी बेंदुराच्या निमित्ताने सजविलेल्या बैलजोड्या पुन्हा एकदा बाजारपेठेत दाखल झाल्याने व्यापारी, ग्रामस्थ आणि ज्येष्ठ नागरिकांनी या पारंपरिक सोहळ्याचे मोठ्या कौतुकाने स्वागत केले. नीरेतील प्रसिद्ध बैलगाडा मालक स्वर्गीय भागूजी दगडे पाटील यांच्या निवासस्थानासमोर घरातील महिलांनी बैलांचे विधिवत पूजन केले. त्यानंतर दगडेवस्ती येथून सुरू झालेली सवाद्य मिरवणूक नगर रोड, बुवासाहेब चौक, ग्रामदैवत लक्ष्मीमाता मंदिर, पालखी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अहिल्यादेवी होळकर चौक मार्गे शिवतक्रारवाडी येथील भैरवनाथ मंदिरापर्यंत काढण्यात आली. यावेळी फटाक्यांची आतषबाजी करून सणाचा उत्साह अधिकच खुलविण्यात आला. बेंदुर सणानिमित्त सकाळपासूनच नीरा बाजारपेठेत सजावटीच्या साहित्याच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांची मोठी गर्दी झाली होती. ज्या शेतकऱ्यांकडे बैलजोडी नाही, त्यांनी मातीची बैलजोडी खरेदी करून देवघरासमोर तिची पूजा केली. यंदा पावसाने उशिरा का होईना, चांगली सुरुवात केल्याने शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या असून, शेतीपूरक व्यवसायांमध्येही आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे. बेंदुरासाठी बैलांना कालव्याच्या आणि ओढ्या-नाल्याच्या पाण्यात अंघोळ घालून त्यांची विशेष सजावट करण्यात आली. शिंगांना आकर्षक रंग, बेगड, मोरपिसे, गोंडे आणि फुग्यांनी सजविण्यात आले. अंगावर विविध रंगांची नक्षी काढून सर्जा-राजांना पारंपरिक रूप देण्यात आले होते. दिवसभर शेतकरी आपल्या बैलांच्या सजावटीत मग्न असल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळाले.

पुणे जिल्ह्यात प्रामुख्याने बैलपोळा साजरा केला जात असला, तरी नीरा नदीच्या काठावरील काही गावांमध्ये देशी बेंदुराची परंपरा आजही जपली जाते. पुरंदर तालुक्यातील वीर, परिंचे, कांबळवाडी, मांडकी, जेऊर, पिंपरे (खुर्द), नीरा-शिवतक्रार, गुळुंचे, कर्नलवाडी तसेच बारामती तालुक्यातील निंबूत, फरांदेवस्ती आणि गडदरवाडी येथे हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. बैलगाडा शर्यतीवरील बंदी उठल्यानंतर अनेक हौशी बैलगाडा मालकांनी नव्याने बैलजोड्या खरेदी केल्या आहेत. खिलारी गाय आणि बैलांची संख्या वाढत असल्याचे नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विक्रम दगडे यांनी सांगितले. ग्रामीण संस्कृतीचे प्रतीक असलेल्या बेंदुर सणानिमित्त घरोघरी पुरणपोळीचा बेत करण्यात आला असून, बैलांना नैवेद्य दाखविल्यानंतर कुटुंबीयांनी सणाचा गोडवा अनुभवला.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### कॉरिडॉर अडीच वर्षांत करणार, योग्य मोबदलाही देणार : मुख्यमंत्री

पंढरपूर : श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी दरवर्षी लाखो भाविक येतात. भाविकांची सातत्याने वाढणारी संख्या लक्षात घेता, मंदिर परिसर अधिक प्रशस्त असावा व आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे काळाची गरज आहे. त्यादृष्टीने यावर्षीच पंढरपूर मंदिर कॉरिडॉरच्या कामाला सुरुवात करण्यात येणार असून, अंदाजे चार वर्षे लागणारे हे काम केवळ अडीच वर्षांत वेगाने पूर्ण करण्यात येईल. यानंतर दर्शन व्यवस्था अधिक सुलभ, सुव्यवस्थित आणि सुरळीत होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री फडणवीस यांनी सहपरिवार पंढरपूर येथे विठ्ठल-रुक्मिणी मातेची शनिवारी पहाटे शासकीय महापूजा केली. यानंतर झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मंदिरातील बहुतांश काम पूर्ण होत आले आहे. आजूबाजूच्या परिसराचे काम सुरू करायचे आहे. पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी लाखो लोक येतात. येवढ्याशा जागेत ते पांडुरंगाच्या कृपेने दर्शन घेतात. कोण कसा येतो आणि कसा जातो हे पांडुरंगच पाहतो. आता भक्तांची वाढती संख्या पाहिल्यानंतर या ठिकाणी मोठी जागा करणे गरजेचे आहे. यावर्षी ते काम आपल्याला सुरू करायचे आहे. मी पांडुरंगाच्या साक्षीने शब्द देतो, कोणावर अन्याय होणार नाही. सर्व बाधितांचे योग्य पुनर्वसन करू, सर्वांना उत्तम सोयी देऊ. जे व्यावसायिक आहेत, त्यांचा व्यवसाय दुपटीने वाढेल. जे नागरिक आहेत त्यांना घरे मिळतील. जे भाडेकरू आहेत त्यांनाही काही ना काही मिळेल, अशा पद्धतीने याची रचना करण्यात आली आहे. पुढच्या दोन-अडीच वर्षांत काम होईल. महाराष्ट्रावर विठू माउलीची कृपादृष्टी सदैव राहो, राज्यात सुख-समृद्धी नांदो, शेतकरी सुखी-समृद्ध होवोत आणि जनतेच्या जीवनात आनंद येवो, अशी प्रार्थना मुख्यमंत्र्यांनी केली.

### शिंदेसेनेच्या नेत्याच्या अपघाती मृत्यूला धक्कादायक वळण

अकोला : अकोल्यामधील शिंदेसेनेच्या अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाध्यक्ष शेख मोहसिन शेख समद यांच्या अपघातील मृत्यूला आता धक्कादायक वळण लागले आहे. शेख मोहसिन शेख समद यांचा २३ जुलै रोजी एका रस्ते अपघातात मृत्यू झाला होता. आता त्यांच्या कुटुंबीयांनी हा अपघात नसून घातपात असल्याचा आरोप करत शिंदेसेनेचे माजी जिल्हाप्रमुख मंगेश काळे यांनी शेख मोहसिन शेख समद यांच्या हत्येचा कट रचल्याचा आरोप केला आहे. तसेच मंगेश काळे यांच्यावर पोलिसांनी अटकेची कारवाई करावी या मागणीसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली आहे. याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार २३ जुलै २०२६ रोजी अकोल्यातील नेहरू पार्क परिसरात दुचाकीला चारचाकीने धडक दिल्याने झालेल्या अपघातात शिंदेसेनेच्या अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाध्यक्ष शेख मोहसिन शेख समद हे गंभीर जखमी झाले होते. पुढे रुग्णालयात उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला होता. पण आता हा अपघात नसून घातपात असल्याचा संशय शेख मोहसिन शेख समद यांच्या कुटुंबीयांनी घेतला असून, शिंदेसेनेचे माजी जिल्हाप्रमुख मंगेश काळे यांच्या कारने धडक देऊन ही हत्या घडवल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

### सर्वाधिक सोयाबीनचा 33 आणि कापसाचा 31 लाख हेक्टरवर पेरा

अकोला : पावसाळ्याचा दीड महिना उलटूनही राज्यात खरीप पिकांची पेरणी अपेक्षित वेगाने झालेली नाही. कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार, राज्यात १३ जुलैपर्यंत केवळ ५९ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. गतवर्षी याच कालावधीत ८२ टक्के क्षेत्रावर पेरणी आटोपली होती. यंदाच्या पेरणीत सोयाबीनचा सर्वाधिक म्हणजेच ३३ लाख २० हजार ०५ हेक्टर (७० टक्के) क्षेत्रावर पेरा झालेला आहे. त्या खालोखाल कापसाची ३१ लाख ४७ हजार ४६९ हेक्टर (७४ टक्के) क्षेत्रावर लागवड झाली आहे. दोन्ही पिकांच्या लागवडीने राज्यातील खरीप हंगामात आघाडी कायम राखली आहे. जून महिन्यात अनेक भागांत पावसाने ओढ दिल्यामुळे पेरणी रखडली होती. जुलैच्या सुरुवातीला पावसाने हजेरी लावल्यानंतर पेरणीला वेग आला. मात्र, गेल्या आठ दिवसांपासून पुन्हा पावसाने दडी मारल्याने राज्यातील ४१ टक्के क्षेत्रावरील पेरण्या अद्याप खोळंबल्या आहेत. पुढील काही दिवस समाधानकारक पाऊस झाल्यास उर्वरित क्षेत्रावरील पेरणी पूर्ण होण्याची अपेक्षा कृषी विभागाने व्यक्त केली आहे. राज्यात सर्वात कमी पेरणी कोकण विभागात झाली असून, तेथे केवळ ९ टक्के क्षेत्रावर म्हणजेच २ लाख ३५ हजार ६७१ हेक्टरवर १३ जुलैपर्यंत पेरणी पूर्ण झाली आहे. त्यानंतर नाशिक विभागात ५६ टक्के, पुणे विभागात ३३ टक्के, कोल्हापूर विभागात ३२ टक्के, छत्रपती संभाजीनगर विभागात ६५ टक्के, लातूर विभागात ६३ टक्के, नागपूर विभागात ५३ टक्के, तर अमरावती विभागात राज्यातील सर्वाधिक ८१ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. दोन दिवसात पेरणीला अपेक्षित गती नसल्याचे कृषी विभागाच्या सूत्रांनी सांगितले. जिल्हानिहाय पाहता जळगाव आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक ८३ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. मात्र, राज्याच्या बहुतांश भागात पावसाचा खंड कायम असल्याने उर्वरित क्षेत्रावरील पेरणीसाठी शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.अकोला जिल्ह्यात केवळ ७५ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे

### पोलिसानेच लग्नाचे वचन देत तरुणीवर...; उपचार सुरु असलेली तरुणी कोमात,

अकोला : अकोला जिल्ह्यातील बाळापूर शहरात राहणाऱ्या एका पोलिस कर्मचाऱ्याने एका तरुणीवर अत्याचार केल्याचे प्रकरण समोर आले आहे. त्याने लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार केल्याच्या आरोप कुटुंबीयांनी केला. त्याने नकार दिल्याने तरुणीने गळफास लावून घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. तिची प्रकृती गंभीर असून, बाळापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लग्नास नकार दिल्यानंतर मानसिक तणावातून संबंधित तरुणीने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. कुटुंबीयांच्या सतर्कतेमुळे तिचा जीव वाचला असून, प्रकृती गंभीर असल्यामुळे तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पीडितेच्या वडिलांनी बाळापूर पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, भाडेकरू म्हणून राहणाऱ्या पवन वडगावे याने विवाहाचे आमिष देऊन मुलीशी संबंध ठेवले. त्यानंतर विवाहास नकार दिल्याने मुलगी मानसिक धक्क्यात गेली आणि तिने आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. अनेक दिवस उपचार सुरू असूनही युवती अद्याप कोमात असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणातील महत्त्वाची बाब म्हणजे युवतीचा मोबाईल लॉक होता. ११ जुलै २०२६ रोजी रात्री तो अनलॉक झाल्यानंतर त्यामधील माहिती समोर आली.

### मूर्तिजापुरातील 13 बँक खात्यांमधून 71,726 रुपयांची संशयास्पद उलाढाल

मूर्तिजापूर (जि. अकोला) : राष्ट्रीय सायबर गुन्हे अहवाल पोर्टल (NCRP) आणि 'समन्वय' पोर्टलवरील तपासातून समोर आलेल्या माहितीनंतर मूर्तिजापूर शहर पोलिसांनी सायबर फसवणूक प्रकरणात शुक्रवारी १३ संशयित बँक खातेदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला. देशभरातील नागरिकांची ऑनलाइन फसवणूक करून उकळलेली रक्कम या खात्यांमधून फिरविण्यात आल्याचा संशय असून, संबंधित खात्यांमधून ७१ हजार ७२६ रुपयांची संशयास्पद आर्थिक उलाढाल झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. सायबर सेलच्या उजमा सत्तार सैय्यद यांनी दिलेल्या फिर्यादीवरून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बँक खाती सायबर गुन्हेगारांच्या वापरासाठी उपलब्ध करून दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

# साताऱ्यात पावसाची उघडझाप

## कोयना धरणात ७१ टीएमसी पाणीसाठा



कोयना धरण भरण्यासाठी अजूनही ३४ टीएमसी पाण्याची गरज, पाटण, महाबळेश्वर आणि जावळी तालुक्यांत मुसळधार पावसाने हजेरी

■ सातारा (दै. संध्या)

जिल्ह्याच्या पश्चिम भागात पावसाचा जोर काहीसा मंदावला असून, सातारा शहरातही उघडझाप सुरू आहे. तरीही, २४ तासांत सर्वाधिक पर्जन्यमान जोर येथे १०९ मिलिमीटर झाले. तर, महाबळेश्वरच्या पावसानेही यंदा तीन हजार मिलिमीटरचा टप्पाही पार केला. कोयना धरणातही तीन टीएमसीने वाढ झाली. त्यामुळे शुक्रवारी सकाळी धरणसाठा ७१ टीएमसी झाला होता. धरण भरण्यासाठी अजूनही ३४ टीएमसी पाण्याची गरज आहे.

सातारा जिल्ह्यात मागील पाच दिवसांपासून पाऊस सुरू होता. बुधवार आणि गुरुवारी पश्चिम भागातील पाटण, महाबळेश्वर आणि जावळी तालुक्यांत मुसळधार पावसाने हजेरी लावली. तसेच, कोयनासह धोम, बलकवडी, कण्हेर, तारळी आणि उरमोडी धरण पाणलोट क्षेत्रातही संततधार होती. यामुळे पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली. पावसाचा जोर कायम राहिल्यास हे मोठे पाणी प्रकल्प लवकरच भरण्याची शक्यता आहे. पण, कोयना धरण भरण्यासाठी अजूनही ३४ टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे. तरीही, सध्याचा पाणीसाठा समाधानकारक स्थितीत आहे.

शुक्रवारी सकाळी आठपर्यंतच्या २४ तासांत वाई तालुक्यातील जोर येथे अधिक पाऊस झाला. १०९ मिलिमीटर पाऊस पडला आहे, तर १ जूनपासून आतापर्यंत ३ हजार ४४९ मिलिमीटरची नोंद झालेली आहे.

तसेच, २४ तासांत कोयनानगर येथे ८८, नवजाला ६६ आणि महाबळेश्वरमध्ये ७८ मिलिमीटर पर्जन्यमान झाले. तर, सकाळी कोयना धरणात ३५ हजार क्युसेक वेगाने पाणी येत होते. त्यामुळे धरणात तीन टीएमसीहून अधिक साठा वाढला.

सकाळी ७०.८८ टीएमसी साठा झाला होता. ६७.३४ टक्केवारी पाणीसाठ्याची आहे, तर आतापर्यंत कोयनेला २ हजार २८९, नवजा २ हजार ५९० आणि महाबळेश्वरला ३ हजार ३९ मिलिमीटर पाऊस पडलेला आहे.

## वीर धरणातून विसर्गामुळे पाणीपातळीत वाढ होणार

■ पंढरपूर (दै. संध्या)

नीरा नदीच्या पात्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि वीर धरण भरल्याने धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे आज २५ जुलै २०२६ रोजी दुपारी २.०० वाजल्यानंतर पंढरपूर येथील चंद्रभागा नदीच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता आहे, अशी माहिती लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर यांच्या वतीने देण्यात आली आहे.

वीर धरण यापूर्वीच पूर्ण क्षमतेने भरले असल्याने अतिरिक्त पाण्याचा साठा करणे शक्य नाही. त्यामुळे धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. २२ जुलै २०२६ रोजी ४६०० क्युसेकने सुरू झालेला विसर्ग २४ जुलै २०२६ पासून १५ हजार क्युसेक करण्यात आला असून तो आता २५ हजार क्युसेकपर्यंत वाढवण्यात आला आहे. या पाण्याचा निचरा नीरा नदीमार्गे भीमा नदीत होत असून त्याचा थेट परिणाम चंद्रभागेच्या पातळीवर होणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने पंढरपूर शहरातील भाविक-वारकरी आणि नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. आज दुपारी २ नंतर पाणीपातळीत सातत्याने वाढ होणार असल्याने कोणत्याही नागरिकाने नदीपात्रात उतरू नये, असे आवाहन अधीक्षक अभियंता, लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण (पाटबंधारे विभाग) सोलापूर यांनी केले आहे. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर लाखो वारकरी पंढरपुरात दाखल झाले आहेत. त्यामुळे चंद्रभागा किनारी आणि वाळवंटात विशेष खबरदारी घेण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.



## जवानाने स्वतःवर गोळ्या झाडून केली आत्महत्या

■ पंढरपूर (दै. संध्या)

राज्य राखीव पोलीस बलाच्या एका जवानाने पंढरपुरात आषाढी सोहळ्याच्या बंदोबस्तासाठी आल्यानंतर आत्महत्या केल्याची घटना शनिवारी पहाटे अडीचच्या सुमारास घडली आहे. रामेश्वर ध्रुपद साबणे (रा. गंगाखेड, ता. गंगाखेड जि परभणी ) आहे. रामेश्वर ध्रुपद साबणे संभाजी नगर येथे एस आर पी रुजू होते. आषाढी यात्रेनिमित्त विठ्ठलाच्या ते पंढरपूर येथे बंदोबस्तासाठी आले होते. त्यांनी त्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी स्वतःवर गोळ्या झाडून आत्महत्या केली आहे.

## मुलीला सतत खोकला अन् ताप, ७ वर्षे उपचार घेतले, तरीही काहीच फायदा होईना

■ मुंबई (दै. संध्या)

सततचा खोकला, ताप, भूक न लागणे आणि वजन न वाढणे या त्रासांवर सात वर्षे उपचार घेतल्यानंतर एका दहा वर्षांच्या मुलीच्या आजाराचे अखेर योग्य निदान झाले. लहानपणी तिच्या श्वासनलिकेत पेनाचे टोपण अडकले होते. त्यामुळे तिच्या डाव्या फुप्फुसाच्या खालच्या भागाला गंभीर इजा झाली होती.नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल मुंबईतील खासगी रुग्णालयात ब्रॉन्कोस्कोपी आणि शस्त्रक्रिया करून तिच्यावर उपचार करण्यात आल्यानंतर सध्या तिची प्रकृती स्थिर आहे.

ही मुलगी साडेतीन वर्षांची असल्यापासून तिला सतत खोकला, ताप, भूक न लागणे आणि वजन न वाढणे असा त्रास सुरू होता. टीबीचा संशय आल्याने तिच्यावर त्यानुसार उपचार करण्यात आले. मात्र प्रकृतीत सुधारणा झाली नाही. त्यानंतर तिला दम्याचे निदान करून इनहेलर देण्यात आले; परंतु त्रास कायम राहिला. अखेर तिला मुंबईतील लहान मुलांच्या खासगी रुग्णालयात आणण्यात आले.

नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलच्या पीडियाट्रिक पल्मोनोलॉजीच्या वरिष्ठ सल्लागार डॉ. इंदू खोसला (बालरोग फुप्फुसरोगतज्ज्ञ) यांनी तिची तपासणी करून योग्य निदान केले. मुलाला बराच काळ सतत खोकला असेल, फुप्फुसांचे वारंवार संसर्ग होत असतील किंवा फुप्फुसाच्या एकाच भागात पुन्हा पुन्हा समस्या निर्माण होत असेल, तर श्वासनलिकेत बाह्य वस्तू अडकली असण्याची शक्यता तपासणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

### ब्रॉन्कोस्कोपीत झाले निदान

सीटी स्कॅनमध्ये मुलीच्या डाव्या फुप्फुसाच्या खालच्या भागाला इजा झाल्याचे दिसून आले. त्यानंतर केलेल्या ब्रॉन्कोस्कोपीमध्ये तिच्या श्वासनलिकेत अनेक वर्षांपासून पेनाचे झाकण अडकले असल्याचे स्पष्ट झाले. ते झाकण बाहेर काढण्यात आले; मात्र फुप्फुसाच्या खालच्या भागाला कायमस्वरूपी इजा झाली होती. संसर्गाचा धोका लक्षात घेऊन खराब झालेला भाग काढण्यासाठी थोरॅकोस्कोपिक लेफ्ट लोअर लोबेक्टॉमी शस्त्रक्रिया करण्यात आली. या उपचारांमुळे मुलीच्या जिवावरील धोका टळला.

## पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर उभ्या ट्रकवर लक्झरी धडकली

■ शिरवळ(दै. संध्या)

पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील खंडाळा तालुक्यातील धनगरवाडी हद्दीत मालट्रकच्या वायपरचा रॉड स्टिअरिंगवर पडल्याने तो महामार्गाच्या बाजूला उभा केला होता. त्याचवेळी पाठीमागून भरधाव आलेल्या लक्झरी बसने दिलेल्या धडकेत लक्झरीमधील १८ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. या प्रकरणी लक्झरी बसचा चालक वैभव तात्याबा पवार (वय ३७, रा. पाटण) याच्याविरुद्ध शिरवळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत माहिती अशी की, कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील जवाहर साखर कारखान्याची साखर पोती मालट्रक क्रमांक (एमएच ५० एन ३८८८) मध्ये भरून वाशी मार्केट, मुंबई येथे चालक रमाकांत चुडामन यादव (३५) हा घेऊन निघाला होता. मालट्रक गुरुवार, दि. २३ रोजी मध्यरात्री एकच्या सुमारास धनगरवाडी हद्दीत एका हॉटेलजवळ आला असता, मालट्रकचा वायपर रॉड अचानकपणे स्टिअरिंगवर पडल्याने ट्रकचालक रमाकांत यादव याने ट्रक महामार्गाच्या बाजूला घेतला. त्यावेळी पाठीमागून भरधाव आलेल्या लक्झरी बस क्रमांक (एमएच ०४ एनबी १४५४) वरील चालक वैभव पवार याचे लक्झरी बसवरील नियंत्रण सुटल्याने मालट्रकला जोरदार धडक दिली. या धडकेत लक्झरी बसमधील १८ प्रवासी गंभीर जखमी झाले. या अपघाताची माहिती मिळताच शिरवळ पोलिस, सारोळा महामार्ग पोलिस मदत केंद्राचे पोलिस व शिरवळ रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी धाव घेत जखमींना शिरवळ ग्रामपंचायत, १०८ रुग्णवाहिकांच्या माध्यमातून शिरवळ येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद शिरवळ पोलिस ठाण्यात झाली आहे.




## थोडक्यात पण महत्वाचे...




### पिंगोरी येथे इला हॅबिटॅटमध्ये आरोग्यसेवांच्या विविध उपक्रमांचे लोकार्पण

जेजुरी (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील पिंगोरी येथील इला हॅबिटॅट मध्ये आरोग्यसेवेला बळकटी देणाऱ्या विविध उपक्रमांचे लोकार्पण पार पडले. यामध्ये "अरुण आणि वंदना जोशी सेंटर फॉर फिजिओथेरपी अँड आऊटरीच ICMR-PMO-GOI च्या NOHM अंतर्गत वैद्यकीय प्रयोगशाळा तसेच टाटा मोटर्सतर्फे इला फाऊंडेशनला प्रदान करण्यात आलेल्या रुग्णवाहिकेचे (मोबाईल मेडिकल युनिट) उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमांचे उद्घाटन बारामती अॅग्रोचे अध्यक्ष राजेंद्र पवार ,एनआयव्ही मुंबईचे प्रभारी अधिकारी डॉ. शैलेश पवार,सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे मुख्य वित्तीय अधिकारी सतीश देशपांडे,टाटा मोटर्सचे जैवविविधता विभाग प्रमुख डॉ. नवीन पांडे ,ऑप्टिमा लाइफसायन्सेसचे अध्यक्ष विनय कुलकर्णी,तसेच सासवड येथील चिंतामणी हॉस्पिटलचे संचालक व प्रसूतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय रावळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डेक्कन कॉलेज, पुणेचे कुलगुरू डॉ. प्रसाद जोशी यांच्या हस्ते या प्रकल्पाचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमात आरोग्यसेवा ग्रामीण भागापर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या उपक्रमांचे कौतुक करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर, वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गुरु पौर्णिमानिमित श्री गुरु गोरक्षनाथ आश्रम ट्रस्ट येथे विविध उपक्रम



जेजुरी (दैनिक संध्या) : गुरू पौर्णिमानिमित आळंदी येथील श्री गुरु गोरक्षनाथ दिग्विजयनाथ आश्रम ट्रस्ट येथे विविध धार्मिक उपक्रमाबरोबरच आरोग्य सेवेचे आयोजन करण्यात आले आहे. महंत योगी दिग्विजयनाथ रामके महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार दिनांक 29 रोजी गुरु पौर्णिमेनिमित गुरु गोरक्षनाथ मठात पहाटे रुद्राभिषेक, गोरक्षनाथ सहस्त्रवली हवन, महाप्रसाद, तसेच सायंकाळी हरिपाठ व भजन या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच डॉ चेतन म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली या आश्रमात मोफत आरोग्य तपासणी, गरजू रुग्णासाठी मोफत शस्त्रक्रिया आणि गुरू पौर्णिमेनिमित महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असल्याचे महंत योगी दिग्विनाथ महाराज यांनी सांगितले. महंत योगी दिग्विजयनाथ महाराज यांच्या वतीने आळंदी रोडवरील साईबाबा मंदिर परिसरात गुरू गोरक्षनाथ मंदिर,आश्रम उभारण्यात आले असून, गुरू पौर्णिमा,गोरक्षनाथ जयंती आदी विविध उपक्रमाचे दरवर्षी आयोजन करण्यात येते.

### चाकण शहरात मोकाट कुत्र्यांची दहशत



चाकण (दैनिक संध्या) : चाकण नगरपरिषद हद्दीत व प्रभाग क्रमांक दोन मधील गोरे वाडा आणि लगतच्या परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोकाट कुत्र्यांची प्रचंड दहशत वाढली आहे.भटक्या कुत्र्यांमुळे स्थानिक नागरिक, लहान मुले आणि ज्येष्ठांमध्ये मोठी भीती व दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही भागातील नागरिक घरात उरलेले शिळे अन्न रस्त्यावर फेकत असल्याने कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी परिसरात फिरत आहेत. या समस्येची गांभीर्याने दखल घेत चाकणच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी व महिला आणि बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे यांनी तात्काळ सूत्रे हलविली. त्यांच्या विशेष पाठपुराव्यातून नगरपरिषदेच्या माध्यमातून तातडीने कुत्री पकडण्याची मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेअंतर्गत गोरे वाडा परिसरातील भटक्या कुत्र्यांना यशस्वीरीत्या पकडून सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. गोरे वाडा परिसरात कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे पादचाऱ्यांना येजा करणे कठीण झाले होते. लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. नगराध्यक्ष मनीषा गोरे व नगरसेविका रुपाली कांडगे यांनी नागरिकांची ही समस्या ओळखून नगरपरिषद प्रशासनाकडे तात्काळ पाठपुरावा केला. कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. या धडक कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे.

"चाकणमध्ये कुत्री पकडण्याची मोहीम सुरू ठेवली जाणार आहे. नगरपरिषदेने पकडलेली कुत्री सुरक्षित ठिकाणी हलवली आहेत. सर्वांनी दक्षता घेणे अपेक्षित वाटते."

- डॉ. अंकुश जाधव, मुख्याधिकारी, चाकण नगरपरिषद

# राजगुरुनगरात खेड तालुका शिवसेनेचा रास्ता रोको

## शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी




राजगुरुनगर (दै. संध्या)

शिक्षण मंत्र्याचा राजीनामा देऊन चालणार नाही, पंतप्रधान, गृहमंत्री यांनी देखील राजीनामा द्यायला पाहिजे ,अशी मागणी करत खेड तालुका शिवसेनेच्या वतीने NEET परीक्षेच्या कथित पेपरफुटी आणि जंतर मंतर येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ राजगुरुनगर येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. राजगुरुनगर येथे पुणे नाशिक महामार्गावर खेड तालुका उद्धव ठाकरे शिवसेनेच्या वतीने NEET परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ जोरदार आंदोलन करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे सह संपर्क प्रमुख दिलीप भोर,जिल्हाध्यक्ष रामदासआबा धनवटे,तालुका प्रमुख शिवाजी वर्पे,शहर प्रमुख दिलीप तापकीर,माजी तालुका प्रमुख सुरेश चव्हाण,पुणे जिल्हा संघटक विजया शिंदे,पंचायत समिती सभापती विद्याताई मोहिते,उपसभापती मंगेश सावंत,महिला शहर प्रमुख उर्मिला सांडभोर,युवा प्रमुख तन्मय काळे,ग्राहक संरक्षण कक्ष,संघटक बाळासाहेब ताये,किरण गवारी,संतोष राक्षे,राहुल मलघे,एल. बी. तनपुरे,अशोक वाळुंज ,बाबा इनामदार, व शिवसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच या आंदोलनात महाविद्यालय विद्यार्थिनी सहभागी झाले होते. यावेळी बोलताना सहसंपर्क प्रमुख दिलीप भोर म्हणाले विद्यार्थ्यांना बेरोजगार,झुरळ, आतंकवादी संबोधणाऱ्यांना खुर्चीवर बसण्याचा नैतिक अधिकार नाही,सरकार जनतेविरोधी असून त्यांनी देश विकायला काढला आहे. लोकशाही पूर्ण मृत झाली आहे.जंतर मंतर येथील उपोषणाने देशात क्रांतीची ठिणगी पडली आहे .देशात अशीच परिस्थिती राहिली तर मोठी क्रांती घडेल. लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य उध्वस्त करू पाहत असलेले भाजपा पूर्वीचे इंग्रज आणि मोगलापेक्षा अधिक अन्याय जनतेवर करत आहे.

जिल्हा प्रमुख रामदास धनवटे म्हणाले दिल्लीतील जंतर मंतरवर शांततेत चाललेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलन दरम्यान दिल्ली पोलिसांकडून अमानूष अत्याचार करण्यात आला.आंदोलनातील तरुणाची हिंमत पाहून सरकारला उशीरा जाग आली.सरकार ने जे पाप केले त्यांना २०२९ ला फेडावे लागेल, जिल्हा संघटक विजया ताई शिंदे:जंतर मंतर येथे वीस दिवस चाललेल्या आंदोलन दरम्यान विद्यार्थ्यांनी लाठी काठी खाल्ल्या मात्र शासनाने एक शिक्षण मंत्री सांभाळताना विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष केले.सरकारचा वेळ फक्त आमदार खासदार फोडण्यात चालला आहे यावेळी पंचायत समिती सभापती विद्याताई मोहिते,महाविद्यालयीन विद्यार्थिनी,शिवाजी वर्पे यांनी शासन विरुद्ध निषेध व्यक्त केले.

## परतीच्या प्रवासानंतर वाल्मीकींचा पालखी सोहळा स्वगृही दाखल

वाल्हे (दै. संध्या)



जातो माघारी पंढरी नाथा !
तुझे दर्शन झाले आता !!

विठुरायासह रुक्मिणी मातेच्या मुख दर्शनाने तृप्त झालेला महर्षी वाल्मीकी ऋषींचा पालखी सोहळा परतीचा प्रवास उरकून सुखरूपपणे स्वगृही दाखल झाल्याने वाल्हेकर ग्रामस्थांकडून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी महर्षी वाल्मीकींच्या पालखी सोहळ्याने पंढरपूर येथे आषाढी एकादशीचा सोहळा उरकल्यानंतर व्दादशीला थेट परतीचा प्रवास सुरु केला होता. रविवारी (दि. २६) पुरंदर तालुक्यातील कामठवाडीचा शेवटचा मुक्काम आटोपल्यावर सोमवारी सकाळी सव्वा नऊच्या सुमारास या पालखी सोहळ्याचे वाल्हे नगरीत उत्साही वातावरणात आगमन झाले.

यावेळी वाल्हे गावचे सरपंच अतुल गायकवाड यांसह जिल्हा परिषदेच्या सदस्या डॉ.प्राजक्ता दुर्गाडे तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष सत्यवान सूर्यवंशी संजय खवले पतंग शहा तसेच परिसरातील वारकरी संप्रदायासह ग्रामस्थांनी टाळ मृदुंगाच्या गजरात व माउलींच्या जयघोषात वाल्मीकींच्या पालखी सोहळ्याचे जल्लोषात स्वागत केले. याप्रसंगी पालखी सोहळा प्रमुख ह.भ.प.अशोक महाराज पवार तसेच ह.भ.प आदित्य महाराज पवार चोपदार, लक्ष्मण बुणगे तसेच प्रल्हाद पवार विणेकरी, संदीप दुर्गाडे, वारकरी संप्रदायाचे सर्जेराव कदम, भाऊसाहेब पवार, पांडुरंग पवार, अलका चव्हाण, सिंधुबाई पवार, मीना कुंभार, कमल पवार यांसह आदी मान्यवर उपस्थित होते.

## तंबाखू नियंत्रण दिनानिमित्त वकृत्व स्पर्धेचे आयोजन



शिरूर (दै. संध्या)

सार्वजनिक आरोग्य विभाग राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाअंतर्गत ग्रामीण रुग्णालय, शिरूर तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा प्राथमिक माध्यमिक आश्रम शाळा, शिरूर येथे आयोजित करण्यात आली होती. शिरूर नगर परिषदच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती आयेशा शेख, सभापती स्वाती साठे नगरसेविका संगीता मल्लाव ,संजय भटेवरा, ऑड. बाबुराव पाचंगे , शशिकांत शिर्के , संजय जाधव, राजेश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी उपस्थित मान्यवरांच्य हस्ते विजेत्या स्पर्धकांना पारितोषक वितरीत करण्यात आले.

## ज्येष्ठ पत्रकार मृणालिनी ढवळे यांचे निधन

पुणे (दै. संध्या)

'केसरी'च्या निवृत्त मुख्य उपसंपादक मृणालिनी ढवळे यांचे मंगळवारी येथे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या 92 वर्षांच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर. बुधवार दिनांक 29 रोजी सकाळी वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत. मृणालिनी ढवळे यांनी 'केसरी'त दीर्घकाळ काम केले. लोकमान्य टिळक यांच्या नातसून कै. इंदुताई टिळक यांच्या बरोबर त्यांनी 'बाल सह्याद्रि' आणि पुढे 'केसरी'ने मुलांसाठी काढलेल्या 'छावा'ची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. स.वि. बापट यांनी लिहिलेल्या 'लोकमान्यांच्या आठवणी' या केसरी प्रकाशनाच्या ग्रंथाचे संपादन ढवळे यांनी इंदुताई टिळक यांच्यासह केले. शांताबाई टिळक यांच्यावरील 'लोकमान्यांच्या सूनबाई' आणि इंदुताई टिळक यांच्यावरील 'कर्मयोगिनी' या पुस्तकांचे लेखन मृणालिनी ढवळे यांनी केले. 'दृष्टीआडची सृष्टी', 'अंतराळ झेप' 'रेडियम' 'विज्ञान देवाची कहाणी' ही त्यांची आणखी काही पुस्तके. 'अंतराळ झेप' या कादंबरीचा



नेहरु पुरस्काराने गौरव झाला. ही कादंबरी रशियन अंतराळ वीर युरी गागारिन यांच्या जीवनावर आधारित आहे. ज्येष्ठ नेते कै. जयंतराव टिळक यांच्या सूचनेनुसार ढवळे यांनी विधानपरिषदेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त प्रकाशित झालेल्या दोन स्मरणिकांचे संपादनही केले होते. ढवळे यांनी फर्ग्युसन महाविद्यालयातून बी.एस्सी. पदवी मिळवली. पुणे विद्यापीठातून त्यांनी फ्रेंच भाषेचे शिक्षण घेतले होते. रानडे इन्स्टिट्यूटमधील पत्रकारिता अभ्यासक्रमाच्या पहिल्या तुकडीच्या त्या विद्यार्थिनी होत. मराठी भाषा संवर्धन प्रतिष्ठानने 'माध्यम रत्न' पुरस्काराने त्यांना गौरविले होते.

## माहूर माध्यमिक विद्यालय, माहूरचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

काळदरी (दै. संध्या)

■ इयत्ता ७ वी शिष्यवृत्ती परीक्षेत ९० टक्के निकाल




महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता ७ वी शिष्यवृत्ती परीक्षेत श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड संचलित माहूर माध्यमिक विद्यालय, माहूर ता. पुरंदर जि . पुणे या विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन करत ९० टक्के निकालाची नोंद केली. या उत्कृष्ट यशामुळे विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक आणि संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिष्यवृत्ती परीक्षेतील विद्यार्थ्यांच्या या यशामागे नियमित सराव, गुणवत्तापूर्ण अध्यापन आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन हे महत्त्वाचे घटक ठरले.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये सोनवणे समर्थ अनिल -248, कुंभार धनश्री स्वीकार -236, जगताप, खरात अस्मिता स्वप्निल -222, जगताप आयुष संतोष -236, भोसले मानसी राहुल -214, चव्हाण सानिका बाबुराव -176, खोमणे प्रणवती गणेश 174, कांबळे सार्थक दत्तात्रेय -170, खोमणे स्वरा विकास -142 इतके गुण संपादन करून परीक्षेत यश संपादन केल्या बद्दल विद्यार्थ्यांचे व विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत पवार, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक महेंद्र भोसले, रामप्रभू पेटकर, इंद्रभान पठारे, रामचंद्र जगताप, विकास राऊत, स्नेहलता बोरावके, लता गायकवाड, कर्मचारी मंगल जगताप, श्रीकांत खोमणे, राम भाऊ कुंभार, श्रीकांत गव्हाणे या सर्वांचे अभिनंदन संस्थेच्या अध्यक्षा आनंदी काकी जगताप, पश्चिम महाराष्ट्र भाजपाचे सरचिटणीस व संस्थेचे सचिव माजी आमदार संजयजी (चंदुकाका) जगताप, भारतीय प्रशासन सेवा अधिकारी व संस्थेचे विशेष सल्लागार डॉ . राजेंद्र बापू जगताप, संस्थापक सचिव डॉ. एम . एस . जाधव, संस्थेच्या समन्वय सोनाली ताई शिंदे, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा व विश्वस्त सौ राजवर्धिनीताई जगताप,भारती विद्यापीठाच्या संचालिका व विश्वस्त डॉ . अस्मिता ताई जगताप, संस्थेचे सहसचिव दत्तात्रय गवळी तसेच व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे व रवींद्र पंत जगताप यांनी संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन केले.

मुख्याध्यापक तसेच सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पालकांनीही विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचे अभिनंदन केले.

या यशाबद्दल शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, भविष्यातही अशीच उज्ज्वल परंपरा कायम ठेवण्याचा निर्धार शाळेने व्यक्त केला आहे.

# सैनिक मातृभूमीप्रती असलेल्या प्रेमापोटी लढतात

## वायुदलाचे निवृत्त विंग कमांडर तथा आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण तज्ज्ञ विनायक पुरुषोत्तम डावरे यांचे प्रतिपादन

पुणे (दै. संध्या)

■ गोरक्षक सुधीर बहिरवाडे यांना साहस पुरस्कार प्रदान

■ साहस दिनानिमित्त हर घर सावरकर प्रतिष्ठान, डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि पुणे नगर हिंदुसभा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन




सैन्यातील रेजिमेंटल भरतीमुळे एकात्मतेची भावना दृढ होते. सैनिक पैशासाठी नव्हे, तर मातृभूमीप्रती असलेल्या प्रेमापोटी लढतात. ते धर्म आणि देशाच्या रक्षणासाठी लढत असतात, असे प्रतिपादन भारतीय वायुदलाचे निवृत्त विंग कमांडर तथा आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण तज्ज्ञ विनायक पुरुषोत्तम डावरे यांनी केले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी १९१० साली मार्सेलिस बंदरात घेतलेल्या ऐतिहासिक समुद्रउडीच्या स्मरणार्थ हर घर सावरकर प्रतिष्ठान, डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि पुणे नगर हिंदुसभा यांच्या संयुक्त विद्यमाने साहस दिनानिमित्त पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. डेक्कन जिमखाना येथील आयएमडीआर कॉलेजच्या स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात यावर्षीचा साहस पुरस्कार गोरक्षक सुधीर महादेव बहिरवाडे यांना प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाला विनायक डावरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच हिंदू आध्यात्मिक सेवा संस्था, पुणे शहराचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, सात्यकी सावरकर आणि विद्याधर नारगोलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सन्मानपत्र, स्वातंत्र्यवीर सावरकर यांची मूर्ती असे पुरस्काराचे स्वरूप होते.

यावेळी विनायक डावरे म्हणाले, महाराष्ट्रापेक्षा उत्तर भारतात स्वातंत्र्यवीर सावरकरांना अधिक मान दिला जातो. उत्तर प्रदेशात त्यांचे मंदिरही उभारण्यात आले आहे. हिंदू समाजात एकता निर्माण करण्यासाठी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आयुष्यभर कार्य केले. बटेंगे तो कटेंगे, एक रहेंगे तो नेक रहेंगे हा संदेश लक्षात ठेवून हिंदू समाजाने एकजूट राखली पाहिजे. ही गोष्ट स्वातंत्र्यवीर सावरकरांनी शंभर वर्षांपूर्वीच ओळखली होती.

यावेळी सुधीर बहिरवाडे म्हणाले, जातिवाद पूर्वीपासून नव्हता; तो नंतर समाजात पेरला गेला. जातिभेद जाणीवपूर्वक बिंबवण्यात आला. इतिहासात हिंदू धर्मावर अनेक आघात झाले आहेत. आज लव्ह जिहादपेक्षाही लँड जिहाद हा अधिक गंभीर आणि महत्त्वाचा विषय आहे. घराघरांत सावरकर घडले, तर हिंदू राष्ट्राची संकल्पना साकार होण्यासाठी फार काळ लागणार नाही.

कृष्णकुमार गोयल, सात्यकी सावरकर यांनीही मनोगत व्यक्त केले. अश्विनी कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. सुजाता बाबरस यांनी आभार मानले.

## मतदार याद्यांच्या पडताळणी कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद

लोणी काळभोर (दै. संध्या)




लोणी काळभोर ग्रामपंचायतीने घेतलेल्या मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पडताळणी कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याची माहिती लोणी काळभोरचे प्रशासक सरपंच नागेश काळभोर यांनी दिली. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पडताळणी मोहिमेला सुरुवात करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत प्रत्येक मतदाराची माहिती तपासून आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यात येणार आहेत. नव्याने पात्र ठरलेल्या नागरिकांची नावे मतदारयादीत समाविष्ट करणे, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे तसेच नाव, पत्ता आणि इतर तपशीलांतील चुका दुरुस्त करणे, अशी कामे या मोहिमेत केली जाणार आहेत.

यासाठी लोणी काळभोर येथे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) घरभेटी देऊन माहितीची पडताळणी करत आहेत. परंतु आज रविवार असल्याने या मोहिमेचा कँम्प जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये ठेवण्यात आला होता .त्यासाठी प्रशासक सरपंच नागेश काळभोर व शाळेतील शिक्षकांनी नागरिकांना मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पडताळणी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले . आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देत या मोहिमेला सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले होते .त्यासाठी लोणी काळभोर गावात व परिसरात चार ते पाच दिवस रिक्षामधुन तसे आवाहन करण्यात आले.

लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी अचूक आणि अद्ययावत मतदारयादी अत्यंत महत्त्वाची असल्याने पात्र नागरिकांनी या विशेष सखोल पडताळणी मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवला आहे . अतिरिक्त सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी अभिजीत जोशी यांनी सांगितले की २५८०६पैकी १६०४२ फॉर्मचे वाटप झाले असुन १०७१७चे मॅपिंग झाले आहे .प्रशासक सरपंच नागेश काळभोर यांनी उत्कृष्ट पद्धतीने कॅम्पचे आयोजन केल्यामुळे अनेक नागरिकांना या मोहिमेत आपला फॉर्म भरता आला. याबाबत प्रशासक सरपंच नागेश काळभोर यांनी सांगितले की अनेक नागरिकांनी या एसआयआर कॅम्पला भरपूर प्रतिसाद दिला असुन यासाठी अपर तहसीलदार तृप्ती कोलते व बीएल ओ व त्यांचे अधिकारी यांनी खुप मोठे सहकार्य केले आहे.

या मोहिमेत लोणी काळभोर मधील एकही नागरिक वंचित राहणार नाही या पध्दतीने ते काम करत आहेत. मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद या मोहिमेला लागल्याचे नागेश काळभोर यांनी सांगितले.